अंदाज समिती
२०१२ - २०१३
(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

अठ्ठाविसावा अहवाल

सत्यमेव जयते

(माहिम (मुंबई) येथील नवीन पोलीस वसाहतीबाबत समितीचा अहवाल)

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक डिसेंबर, २०१२ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
डिसेंबर, २०१२

अंदाज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

अठ्ठाविसावा अहवाल

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक डिसेंबर, २०१२ रोजी सादर करण्यात आला.)

अंदाज समिती
(२०१२-२०१३)

समिती प्रमुख

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

सदस्य

२) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
३) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स.
४) श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.
५) श्री.कालीदास कोळंबकर, वि.स.स.
६) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
८) श्री.रावसाहेब शेखावत, वि.स.स.
९) श्री.अमित देशमुख, वि.स.स.
१०) कु.प्रणिती शिंदे, वि.स.स.
११) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
१२) श्री.विलास लांडे, वि.स.स.
१३) श्री.राजीव देशमुख, वि.स.स.
१४) श्री.सुरेश देशमुख, वि.स.स.
१५) श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.
१६) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.
१७) श्री.विजयकुमार देशमुख, वि.स.स.
१८) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
१९) श्री.सुभाष देसाई, वि.स.स.
२०) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२१) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२२) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.
२३) श्री.विवेक पाटील, वि.स.स.
२४) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.
* २६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत**)
२७) श्री.अनिल भोसले, वि.प.स.
** २८) श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून**)
२९) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
३०) डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२. श्री.अशोक मोहिते, उप सचिव
३. श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४. श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)
५. श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी
६. श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी

---

* श्री.दिपक सांळुखे, वि.प.स. यांचा दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त.

** श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. यांची रिक्त झालेल्या जागी दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून नियुक्ती.

अंदाज समिती
(२०१०-२०११)

समिती प्रमुख

१) श्री.दिलीप मोहिते, वि.स.स.

सदस्य

* २) श्री.संजय देवतळे, वि.स.स. **(दिनांक १९ नोव्हेबर, २०१० पर्यंत)**
३) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
** ४) श्री.सुभाष झनक, वि.स.स. **(दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून)**
५) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
६) श्री.माणिकराव कोकाटे, वि.स.स.
७) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.
८) श्री.राजीव सातव, वि.स.स.
९) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
१०) श्री.शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.
११) श्री.अब्दुल रशीद ताहीर मोमिन, वि.स.स.
१२) श्री.प्रदीप जाधव नाईक, वि.स.स.
१३) श्री.पंकज भुजबळ, वि.स.स.
१४) श्री.गिल्बर्ट मेंडोन्सा, वि.स.स.
१५) श्री.संदिप नाईक, वि.स.स.
१६) श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.
१७) श्री.चैनसुख संचेती, वि.स.स.
१८) पै.संभाजी पवार, वि.स.स.
१९) श्री.प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
२०) श्री.बबन घोलप, वि.स.स.
२१) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२२) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२३) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
२४) श्री.अबु आसिम आजमी, वि.स.स.
*** २५) श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. **(दिनांक ५ डिसेंबर, २०१० पर्यंत)**
२६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
२७) श्री. मोहन जोशी, वि.प.स.
२८) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
२९) श्री.जगदीश गुप्ता, वि.प.स.
३०) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.र.आ.सावंत, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४) श्री.भा.शं.गायकवाड, अवर सचिव (समिती)
५) श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी

---

* श्री.संजय देवतळे, वि.स.स. यांचा दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून समावेश झाल्यामुळे जागा रिक्त.

**श्री.सुभाष झनक, वि.स.स. यांची रिक्त असलेल्या जागी दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून नियुक्ती.

*** श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे जागा रिक्त.

अ नु क्र म णि का

अ.क्र. (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
१)	प्रस्तावना	
२)	अहवाल	
३)	समितीचे अभिप्राय व शिफारशी	
४)	बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त	

प्रस्तावना

मी अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन, माहिम (मुंबई) येथील नवीन पोलीस वसाहतीबाबत समितीचा अहवाल अंदाज समितीचा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी मुंबईतील माहिम नवीन पोलीस वसाहत इमारतीच्या दुरवस्थेबाबत माहिम येथे भेट देऊन पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर भेटीच्या वेळी आढळून आलेल्या बाबीच्या अनुषंगाने दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १२ जानेवारी, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षी घेण्यात आल्या. समितीने मुंबईतील माहिम नवीन पोलीस वसाहत इमारतीच्या दुरवस्थेबाबत माहिती दिलेल्या भेटीच्या वेळी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सदर अहवालात आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त केल्या आहेत.

समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून साक्ष दिल्याबद्दल श्री.उमेशचंद्र सरंगी, तत्कालीन अपर मुख्य सचिव (गृह), श्री.एस.के.मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.प्रवीण दिक्षित, व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ श्री.तामसेकर मुख्य अभियंता, (सार्वजनिक बांधकाम विभाग) श्री.महेंद्र वारभुवन, मुख्यधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारण यांची समिती अत्यंत आभारी आहे.

समितीच्या प्रदीर्घ काळ चाललेल्या बैठकीच्या वेळी आपला अमूल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

समितीने रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन
नागपूर,
दिनांक : डिसेंबर, २०१२.

(शामराव उर्फ बाळासाहेब पाटील)
समिती प्रमुख
अंदाज समिती

अहवाल

माहिम मच्छिमार कॉलनी येथील जूनी निवासस्थाने पाडून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी ५५० निवासस्थाने बांधण्याबाबत गृह विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

१) **पार्श्वभूमी** :- माहिम मच्छिमार कॉलनी येथील १४ इमारती पोलीस वसाहती म्हणून या कार्यालयास सन १९८० मध्ये, म्हाडा कार्यालयाकडून विकत घेण्यात आले आहे. सदर इमारतीमध्ये १३४४ निवासस्थाने आहेत. सदर इमारती खाडीच्या जवळपास असल्यामुळे समुद्राच्या खाऱ्या वाऱ्यामुळे त्यांची दुरावस्था झालेली आहे.

२) **सध्यस्थिती** :- या वर कायमस्वरुपी उपाय करण्याच्या दृष्टीने पोलीस दलाच्या आधुनिकीकरणांतर्गत सदर इमारतीच्या पूनर्बांधणीचा प्रकल्प शासनाकडून राबविण्यात येत आहे. त्यासाठी शासनाने रु. १३ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. (शासन नियम परिशिष्ट ३ मध्ये कृपया पहावा)

सदरची जागा ही महाराष्ट्र शासनाच्या नावे नमुद आहे. सदर ठिकाणी इमारतीचा पूनर्विकास करावयाचा असल्यास सदर भूखंड या विभागाच्या नावावर असणे आवश्यक आहे. या प्रकरणी सदर भूखंड ९९ वर्षाकरिता लिजवर देण्याबाबत तसेच त्यावर बांधकाम करण्यासाठी ना हरकत देण्याबाबत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याशी पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच या बाबत शासनासही कळविण्यात आलेले असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

- सदर इमारती तळमजला + पाच मजला स्वरुपाच्या असून प्रत्येक इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर एकूण १६ अशी एकूण ९६ निवासस्थाने आहेत. प्रत्येक सदनिकेमध्ये बैठकखोली, स्वयंपाकघर, स्नानगृह, प्रसाधनगृह व सामाईक व्हरांडा यांचा समावेश असून सदर इमारत ही पूर्वरचित (Precast) तंत्रज्ञानाने बांधण्यात आली असून या इमारतीतील बैठक खोली, स्वयंपाकगृह, प्रसाधन गृह, स्नानगृह यासाठी सिपोरेक्सचा (Siporex) वापर करण्यात आल्याने एकबांध बांधकामाऐवजी सर्व ठिकाणी सांधे (Joints) आहेत. तसेच बीम व कॉलम पुर्वरचित (Precast) आहेत. भिंती कौक्रीटच्या पोकळ ब्लॉकच्या आहेत.

  सदर इमारतींना जवळपास ३२ वर्षे पूर्ण झाली असून बाह्य गिलाव्याला तडे गेल्याने सळयांचा व्यास काढुन कौक्रीटच्या पृष्ठभागावर तडे जाऊन या इमारती कमकूवत झाल्या आहेत. या व्यतिरिक्त प्रसाधनगृहाच्या (Siporex Slab) च्या सहा सांध्यातून गळती सुरु झाली असून अन्य ठिकाणी खालील नमूद कारणांमुळे विविध ठिकाणी गळतीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे.

१) स्वयंपाक गृहातील (Nahani trap) नहानी ट्रॅप हा छत पातळीवर असून त्यामुळे त्यातून सांडपाण्याच्या विसर्ग व्यवस्थीत होत नाही.

२) स्वयंपाकगृहामध्ये रहीवाशी कपडे धुणे, लादी पाण्याने धुणे, वॉशिंग मशीनचे पाणी स्वयंपाक गृहामध्ये सांडणे असे प्रकार सर्रास सुरु असून यामुळे बांधकामाच्या सांध्यामधून गळतीचा प्रादुर्भाव होऊन छत (Slab) कमकूवत झाली आहेत.

३) या इमारतीचे बांधकामास ३२ वर्ष पूर्ण झाली असून भिंतीसाठी वापरण्यात आलेले पोकळ कॉक्रिट ब्लॉक (Hollow Block) ही तितकीच जूने असल्याने या पोकळ ब्लॉकमध्ये पावसाचे पाणी झिरपून आतील भिंतींना ओलावा येण्याचे प्रकार पावसाळयात विशेषत्वाने दिसून येत आहेत.

४) या इमारतीचे छतास दोन्ही बाजूस उतार असून छतास संरक्षण भिंत (Parapet Wall) नसल्याने व (Rainwater Pipe) नसल्याने छताचे पडणारे पावसाचे पाणी भिंतीवरुन ओघळून (Column, Beam) भिंतीच्या सांध्यातून आत झिरपण्याचे प्रमाण वाढले आहे.

५) या इमारतींना सामाईक व्हरांडा असून व व्हरांडासमोर संरक्षित कठडे असून व व्हरांडयातून पावसाचे पाणी व्हरांडयातील फरशीवर पडून प्रथम फरशांच्या सांध्यातून व नंतर पोकळ कॉक्रीट ब्लॉकच्या सांध्यातून झिरपत असल्याने कॉक्रीटला तडे जाऊन बऱ्याच ठिकाणी छताच्या सळया उघडया पडल्या असून छत कमकुवत झाली आहेत.

वरील प्रमाणे दुरावस्था लक्षात घेता इमारतींची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. व त्या अनुषंगाने पोलीस टप्पा क्र.१ मध्ये १४ इमारतींपैकी इमारत क्र.२ व ३, ९, १३, १५, १६ या सहा इमारतींची दुरुस्ती जुलै २००७ अखेर पूर्ण करण्यात आलेला आहे.

ह्या विभागामार्फत या इमारतींची किरकोळ दुरुस्ती (गिलावा व रंगकाम इ.) केला जातो. परंतु इमारत क्र.१,४,७,८,१४,१७,१८,१९ ह्या इमारती अत्यंत कमकुवत असून या इमारतींच्या स्नानगृहाचे व प्रसाधनगृहाचे नुतनीकरण, जलवाहिन्या / मलःनिसारण वाहीन्या नुतनीकरण व स्वयंपाकगृह व बैठकखोली मधील फरशी व जिन्याची व व्हरांडयांच्या दुरुस्ती, दरवाजे खिडक्या व संरचनात्मक दुरुस्ती मोठया प्रमाणात आवश्यक असल्याने त्यास स्वतंत्र निधीची आवश्यकता आहे. सदर परिसराच्या साफसफाईसाठी पोलीस खात्याकडून इतर पोलीस वसाहती प्रमाणेच येथेही सफाई कामगारांकडून साफसफाई ठेवल्यास तेथील वातावरण आरोग्यदायी राहील व रहिवाश्यांना जीवनमान सुसह्य होईल. तसेच सदर वसाहतींची चर्तुसिमा निश्चित केलेली नाही. त्यामुळे ज्या भागात झोपडपट्टी वसाहत आहे तिकडून झोपडपट्टीवासियांचे कॉलनीतून ये-जा सुरु राहते. तरी वसाहतीस संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे.

माहिम येथील नवीन पोलीस इमारतीच्या इमारत क्र. १/४/७/८/१४/१८/१९ च्या एकूण ७ कामांसाठी रु.४,६२,२१,५७३/- इतक्या रकमेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. या इमारती अत्यंत कमकुवत असून, या इमारतीच्या सर्वकष दुरुस्तीसाठी प्राप्त झालेला निधी अपुरा असून, प्राप्त झालेल्या निधीतून फक्त स्नानगृह/प्रसाधनगृह नुतनीकरण व जलवाहिण्या/मलनिस्सारण वाहिन्यांच्या नुतनीकरणाची कामेच पूर्ण करणे शक्य असून, अन्य आवश्यक कामे किचन कट्ट्याचे नुतनीकरण, स्वयंपाकगृह व बैठकीच्या खोलीमधील

फरशी, जिन्याची व वऱ्हांड्याची दुरुस्ती, दरवाजा/खिडक्या नुतनीकरण/सरचनात्मक दुरुस्ती रंगकाम इ. कामे हाती घेणे शक्य होत नाही व झालेल्या कामाचा परिणाम दिसून न आल्याने तसेच सदर निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करणे आवश्यक आहे. माहिम येथील इमारती या ३० वर्षापूर्वी पूर्वरचित कॉक्रीट व पोकळ कॉंक्रीट ब्लॉक्स, सिपोरेक्स स्लॅबचा वापर करुन बांधण्यात आलेल्या आहेत. सध्यस्थितीत इमारतीत मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मा.सहपोलीस आयुक्त यांनी सदर इमारती खाजगीकरणाद्वारे पुर्नबांधणी करणेचा प्रस्ताव विचाराधीन असल्यामुळे माहिम टप्पा ३ कामे हाती घेण्यात येवू नये असे निदेश दिलेले आहेत. तथापि, सदर इमारती पोलीस खात्याकडून रिक्त होणार नाहीत व निधी खर्च करणेचे दृष्टीने वरळी, नायगाव धारावी येथील इमारतीची दुरुस्ती प्रस्तावित आहे. या मंजूर ७ कामाऐवजी खालील कामे हाती घेण्याचा विभागाचा प्रस्ताव आहे.

अ.क्र.	कामाची नावे	अंदाजित रक्कम (लक्ष)
१)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. १	रु.१०.५०
२)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. ५	रु.१०.५०
३)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. १३	रु.१०.५०
४)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. १७	रु.१४.४५
५)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. २२	रु.१०.५०
६)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. ३०	रु.१०.५०
७)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. ३३	रु.१४.४५
८)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ७२० निवासस्थानातील इमारत क्र. ३६	रु.१४.४५
९)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ३६० निवासस्थानातील इमारत क्र. ३७	रु.१४.४५
१०)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ३६० निवासस्थानातील इमारत क्र. ५२	रु.१४.४५
११)	वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील ३६० निवासस्थानातील इमारत क्र. ५३	रु.१४.४५
१२)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-५/१.	रु.९.००
१३)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-५/२.	रु.९.००
१४)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-५/३.	रु.९.००
१५)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-२/१.	रु.५.५०
१६)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-२/२.	रु.५.५०
१७)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-२/३.	रु.५.५०
१८)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. ए-४, ए-३, सी-१,२,३	रु.९.५०
१९)	नवीन वरळी पोलीस कॅम्प, वरळी येथील १६० निवासस्थानातील इमारत क्र. सी-४/१,२,३, ए-२, ए-७.	रु.८.८०
२०)	१० हेड कॉन्स्टेबल व ७६ कॉन्स्टेबल इमारत, भोईवाडा	रु.४०.००
२१)	पि.एस.आय. निवासी इमारत, भोईवाडा	रु.१०.००
२२)	नविन पोलीस कॉलनी इमारत क्र, २, माहिम	रु.६०.००
२३)	नविन पोलीस कॉलनी इमारत क्र. ३, माहिम	रु.६०.००
२४)	पोलीस कॉन्स्टेबल इमारत क्र. ७, धारावी	रु.४५.००
२५)	पोलीस कॉन्स्टेबल इमारत क्र.१४, धारावी	रु.४५.००

	एकूण :-	**४६१.००**

मुंबईतील माहिम नवीन पोलिस वसाहत इमारतीच्या दुरावस्थेबाबत माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने गृह विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती मागविली. सदर वसाहतीची देखभाल-दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होत असल्याने त्यांनी पुढील प्रमाणे माहिती सादर केली.

- नवीन पोलीस वसाहतीतील १९ इमारतीचे बांधकाम म्हाडामार्फत १९७८ साली पूर्ण करण्यात आले. ह्यापैकी १४ इमारती (इमारत क्र .१, २, ३, ४, ७, ८, ९, १३, १४, १५, १६, १७, १८, १९) गृह विभागाने पोलीस निवासस्थानासाठी त्यावेळी म्हाडाकडून घेतल्या आहेत. सदर इमारती तळमजला + पाच मजला स्वरुपाच्या असून प्रत्येक मजल्यावर एकूण १६ निवासस्थाने याप्रमाणे प्रत्येक इमारतीत ९६ अशी एकूण १३४४ निवासस्थाने आहेत.
- दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत किरकोळ दुरुस्तीची व विशेष दुरुस्तीची कामे करण्यात येतात. माहीम कॉलनीसाठी विशिष्ठ तरतूद राखीव नसते. विभागाला प्राप्त झालेल्या अनुदानातच उपभोग्त्याच्या मागणीनुसार किरकोळ दुरुस्तीचा खर्च भागविण्यात येतो.

या वसाहतीतील १४ इमारतींपैकी इमारत क्र.२,३,९,१३,१५,१६ या एकूण ६ इमारतींवर पोलीस फंडातून टप्पा १ व २ मध्ये रु.४६४ लक्ष इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. व त्यामध्ये सदर इमारतीतील संडास-बाथरुमची दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या व किचन ओटा/फरशी जलवाहीन्या व मल:निसारण वाहीनींची कामे करण्यात आली.

- या वसाहतीमधील इमारतीतील प्रत्येक निवासस्थान २३० चौ.फुटाचे असून त्यामध्ये बैठकखोली, स्वयंपाकघर, किचन ओटा व प्रसाधन गृह इ. समावेश आहे. सदर निवासस्थानाची वेळोवेळी आवश्यक ती दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यात येत असते. तसेच इमारतीतील स्वच्छता गृहाचे पाईप/मल:निसारण वाहीन्या इ. चे काम करण्यात येते.
- एवढया मोठया वसाहतीमध्ये निवासस्थान/इमारतीची व परिसराची साफसफाई करण्यासाठी गृह खात्याकडून एकही सफाई कामगार नियुक्त केलेला नाही किंवा सफाईची व्यवस्था देखील केलेली नाही, त्यामुळे वसाहतीत घाण साचते. वाया गेलेले अन्न व कचरा इमारतीच्या मधल्या भागात खिडकीतून टाकला जातो. त्यामुळे इमारतीच्या खाली डुकरे, घुशी, उंदीर यांचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होत असून जमीन पोखरुन माती पृष्ठभागावर काढली गेल्यामुळे फरशी खचली जाते व परिसर कायमचा खराब दिसतो. साफसफाईसाठी पोलीस खात्यामार्फत व्यवस्था करावी. बाहेरील भागात स्वच्छता राहिल्यास रहिवाश्यांचा बराच त्रास कमी होईल व सुसह्य जीवनमान होईल असे वाटते. सदर वसाहतीतील केवळ इमारतींची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून

करण्यात येते. मात्र सदर वसाहतीमधील रस्ते व पर्जन्य गटारे इत्यादीची देखभाल व दुरुस्ती मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येते.

- माहिम पोलीस वसाहतीमध्ये एकूण १९ इमारती आहेत. त्यापैकी १४ इमारती पोलीसांच्या असून त्यांची किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यात येतात. मुंबईतील पोलीस विभागाच्या जुन्या व धोकादायक निवासी व बिगरनिवासी इमारतीच्या भांडवली स्वरुपाच्या दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये ६ इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली होती. या ६ इमारतीमधील कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरीत ७ (इमारत क्र. १,४,७,८,१४,१८ व १९) इमारतींसाठी दुसऱ्या टप्प्यांमध्ये प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली होती. तथापि, सदर इमारतींची अवस्था अतिशय खराब असल्यामुळे त्यावर दुरुस्तीसाठी खर्च करण्यांऐवजी सदर इमारती खाजगीकरणांतर्गत पुर्नबांधणी करणेचा प्रस्ताव पोलीस विभागाच्या विचाराधीन असल्यामुळे सह पोलीस आयुक्त यांनी सदर कामे हाती घेऊ नयेत असे निदेश दिले आहेत. असे जरी असले तरी सदर इमारतींमध्ये पोलीस कर्मचारी राहत असल्याने तेथील किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत. त्यामुळे जबाबदार कोण आहेत या गोष्टीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
- सदर इमारती ह्या पूर्वरचित (Precast) तंत्रज्ञानाने बांधण्यात आल्या असून या इमारतीतील बैठक खोली, स्नानगृह, स्वयंपाकगृह, प्रसाधनगृह यासाठी (Siporex) स्लीपरचा वापर करण्यात आल्याने एकसंध बांधकामा ऐवजी सर्व ठिकाणी सांधे (Joints) आहेत. तसेच बीम व कॉलम (Precast) आहेत. भिंती कॉक्रीटच्या पोकळ ब्लॉकच्या आहेत. ह्या इमारती दलदलीत जागेत असल्यामुळे व बाजुंनी रेल्वे लाईन जात असल्यामुळे रेल्वेच्या बसणाऱ्या हादऱ्यांनी स्लॅबचे सांधे खिळखिळे होतात त्यामुळे दरवेळेस संडास-बाथरुममध्ये पाणी गळतीची समस्या उद्‌भवते.

सदर इमारतींना जवळपास ३२ वर्षे पूर्ण झाली असून बाह्यगिलाव्याला तडे गेल्याने, सळयांचा व्यास वाढून काँक्रीटच्या पृष्ठभागावर तडे जाऊन या इमारती कमकुवत झाल्या आहेत. सदर इमारती म्हाडाकडून बांधण्यात आल्या असून त्या पूर्वरचित काँक्रीटने (Precast Concret) बांधण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर काँक्रीट M-१५ चे असून I.S.४५६-२००० प्रमाणे सदर भागामध्ये Concrete ची ग्रेड कमीत कमी M-३० असणे आवश्यक आहे. सदर इमारतींमध्ये भूकंपरोध Steel वापरले नसावे असे वाटते. तसेच सदर इमारती खाडीलगत असल्यामुळे खारट हवामानामुळे स्टील गंजण्याची प्रक्रीया फारच जलद गतीने होत असते.

तसेच या इमारतीपैकी इमारत क्र. १,४,७,८,१४,१८,१९ या इमारती खाजगी करणाद्वारे पुर्न:बांधणीचा प्रस्ताव विचाराधिन असल्यामुळे सह आयुक्त यांनी सदर इमारतीची कामे हाती घेऊ नये असे निर्देश दिलेले आहेत. सह पोलीस आयुक्त यांचे पत्र परिशिष्ट अ प्रपत्र -१ मध्ये जोडण्यात आले आहे. परंतु सद्य:स्थितीत

या इमारतीच्या निवासस्थानात पोलीस कर्मचारी रहात असल्यामुळे आवश्यक ती किरकोळ दुरस्ती करण्यात येत आहे.

माहीम येथील पोलीस वसाहत

- एकूण - १४ इमारती
- इमारती क्र. १,२,३,४,७,८,९,१३,१४,१५,१६,१७,१८,१९
- बांधकामाचे वर्ष - १९७८ (म्हाडा मार्फत)
- तळ मजला + पाच मजला - एका इमारतीमध्ये ९६ निवासस्थाने
- एकूण सदनिका -१३४४
- इमारती पूर्वरचित (Pre cast) तंत्रज्ञानाने बांधण्यांत आल्या आहेत. एकबंध बांधण्याऐवजी सर्व ठिकाणी सांधे (Joints) आहेत. बिम व कॉलम पूर्वरचित असून भिंती कॉंक्रीटच्या पोकळ ब्लॉकच्या आहेत.
- इमारतीस आज मितीस ३२ वर्ष पूर्ण झाली असून प्रसाधनगृहाच्या Siporex च्या सांध्यातून गळती सुरु आहे. तसेच बाह्य गीलाव्यास तडे गेल्यामुळे इमारतीमध्ये गळती सुरु आहे.
- पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीच्या टप्पा १ ते ३ मधून (इमारत क्र.२,३,९,१३,१५ व १६) इमारतीची एकूण ८ कामे जुलै, २००७ मध्ये पूर्ण करण्यांत आली आहेत. यामध्ये प्रसाधनगृहाचे नुतनीकरण, डक्ट वॉलला बाह्य गीलावा व जलवाहिन्यांची दुरुस्ती इत्यादी कामे केली. तसेच इमारत क्र. १,४,७,८,१४,१८, व १९ या इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. तथापि मा.सह पोलीस आयुक्त, यांनी सदर इमारती खाजगी करणाने पूर्नःबांधणी करावयाचा प्रस्ताव विचाराधीन असल्यामुळे या इमारतीचे काम टप्पा क्र.३ मधून करु नये असे निर्देश त्यांचे पत्र क्र.२३९ दिनांक ३०/१०/२००७ अन्वये दिल्यामुळे ही कामे हाती घेण्यात आली नाहीत.
- तसेच त्यामुळे सदर पोलीस वसाहतीत सन २००७ पासून सा.बां.खात्यामार्फत कोणतीही कायम स्वरुपाची मोठी दुरुस्तीच कामे करण्यात आली नाहीत. वेळोवेळी आवश्यकतेनुसार किरकोळ दुरुस्तीच कामे फक्त करण्यात येतात.
- सदर पोलीस वसाहतीतील एकूण सर्व १४ इमारतीची पोलीस गृहनिर्माण मंडळ मार्फत खाजगी करणाअंतर्गत पुर्नःबांधणी करावयाचे ठरले असून या कामाच्या निविदा निश्चितीची कार्यवाही पोलीस गृहनिर्माण मंडळामार्फत प्रगतीत आहे.
- इमारतीच्या परिसराच्या साफसफाईसाठी पोलीस खात्याकडून सफाई कामगारांची नियुक्ती केली नसल्याने केरकचरा ड्रेनेज लाईनवरच टाकण्यात येतो त्यामुळे मलनिस्सारण वाहिन्या वारंवार तुंबतात.

- दि.२५/०५/२०११ रोजी मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, यांचे समवेत सह पोलीस आयुक्त, मुंबई यांची बैठक झाली या बैठकीमध्ये पोलीस वसाहतीतील तातडीने अत्यावश्यक असणारी किमान दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचे ठरले. बैठकीतील सुचनांच्या अनुषंगाने माहिम येथील १२ इमारतीसाठी तातडीने करावयाची ४८.०० लक्ष रक्कमेची कामे विविक्षीत दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत मंजूर झाली असून पावसाळ्यानंतर तात्काळ करण्यात येतील. यामध्ये आवश्यकतेप्रमाणे दरवाजे व खिडक्यांची दुरुस्ती, मलनिस्सारण वाहिन्यांची दुरुस्ती इत्यादी कामाचा अंतर्भाव आहे.

गृह व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी माहिम पोलीस वसाहत माहिम, मुंबई येथे प्रत्यक्ष भेट देऊन वसाहतीची पाहणी केली पाहणीच्या वेळी समितीला पोलीस वसाहतीच्या इमारतींच्या डक्टमध्ये कचरा व घाण पडलेली असल्याचे आढळून आले. याबाबत समितीला अशी माहिती दिली की, सदरहू इमारतींचा सिव्हील मेन्टेनन्स सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केला जातो आणि साफसफाईचे काम पोलीस विभागामार्फत केले जाते. पोलीस विभागाच्या १४ इमारतींची साफसफाई करण्यासाठी फक्त दोन महिला सफाई कामगार असून त्या वयोवृद्ध आहेत. सफाई कामगारांची भरती करण्यात आलेली नाही. इमारत क्र.अे-१ मधील अनेक सदनिकांच्या गॅलरी मोडकळीस आल्याचे समितीला आढळून आले. इमारत क्र.१-बी या इमारतीची पाहणी केली असता या इमारतीच्या इलेक्ट्रीक मिटरच्या कॅबिनमध्ये पाणी साठलेले असल्याचे आढळून आले. तसेच समितीने रहिवाशांच्या घरामध्ये जाऊन पाहणी केली असता घरामध्ये आंबट, उबट वास येत होता. इमारतीमधील अनेक सदनिकांच्या गॅलरीचे प्लास्टर निघालेले असून गज बाहेर आलेले आहेत. त्यामुळे गॅलरी केव्हाही कोसळू शकते. इमारतीमधील रहिवाशांनी समितीला अशी माहिती दिली की, ही ५ मजल्यांची इमारत असून इमारतीमधील शौचालय, बाथरुम व किचनमधून पाणी गळत असून इमारतीची दुरुस्ती करण्यापेक्षा पुर्नबांधणी करण्यात यावी. तसेच, इमारत क्रमांक १-बी च्या शेजारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे साहित्य ठेवण्यासाठी अनधिकृत खोली बांधण्यात आलेली आहे.

समितीने इमारत क्र.३-अे ची पाहणी केली असता या इमारतीची तीन वर्षापूर्वी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. परंतु समितीला इमारतीमध्ये अनेक ठिकाणी इलेक्ट्रीकच्या वायर्स लोंबकळत असल्याचे आढळून आले. इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी समितीला असे सांगितले की, इमारतीची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. परंतु लिकेज काढण्यात आलेले नाही. समितीने स्थानिक रहिवाशांच्या घराची पाहणी केली असता किचनच्या छताला ओलावा असल्याचे समितीला आढळून आले.

सदरहू भेटीच्या वेळी अंगणवाडी सेविका यांनी समितीला अशी माहिती दिली की, समिती माहिम पोलीस वसाहतीला भेट देणार असल्यामुळे अंगणवाडीच्या समोरचा कचरा कालच उचलण्यात आलेला आहे. पावसाळ्यामध्ये अंगणवाडीतील वर्ग खोल्यांमध्ये पाण्याची गळती होते. अंगणवाडीतील मुलांना बसण्यासाठी

बेंच नसून मुले चटईवर बसतात. सदरहू अंगणवाडीमध्ये १७ मुले होती. त्यानंतर समितीने इमारत क्र.७-अे ची पाहणी केली असता या इमारतीच्या तळ मजल्यावरील सर्व सदनिका बंद असल्याचे आढळून आले. तसेच, इमारतीच्या डक्टमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा व घाण पडलेली होती. यानंतर समितीने इमारत क्र.७-बी ची पाहणी केली असता या इमारतीच्या तळ मजल्यावरील सर्व सदनिका बंद असल्याचे समितीला आढळून आले. या इमारतीमध्ये एकूण ४८ सदनिका असून त्यापैकी १० ते १५ सदनिका बंद असल्याचे तेथील रहिवाशांनी समितीला सांगितले. या इमारतीच्या डक्टमध्ये सुध्दा कचरा व घाण पडलेली असून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत होती. इमारत क्र.२-अे ची पाहणी केली असता तेथील रहिवाशांनी समितीला अशी माहिती दिली की, या इमारतीच्या इलेक्ट्रीक मीटरच्या कॅबिनमध्ये घाण पडलेली असून संपूर्ण इमारतीमध्ये विजेचा करंट येतो. या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी प्रत्येकी १ हजार रुपये काढून इलेक्ट्रीकच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याचे समितीला सांगितले.

समितीला भेटीच्या वेळी आढळून आलेल्या बाबी संदर्भात वसाहतीमधील रहेजा रुग्णालयाच्या हॉलमध्ये माहिम पोलीस वसाहतीच्या संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठक घेण्यात आली. सदरहू चर्चेच्यावेळी माहिम पोलीस वसाहतीतील स्थानिक रहिवाशांनी समितीला अशी माहिती दिली की, माहिम पोलीस वसाहतीमधील ७ नंबरमध्ये लिकेजचा प्रॉब्लेम जास्त प्रमाणात आहे. माहिम पोलीस वसाहतीमधील मुख्य अडचण ही गळतीची आहे. या ठिकाणी श्री.शिर्के नावाच्या विकासकाने बांधकाम बरोबर केलेले नाही. अनेक इमारतीमधील खोल्यांमधून पाणी गळत असते. सदर गळतीचे प्रमाण ३० ते ४० टक्के एवढे आहे. या ठिकाणी असणाऱ्या ड्रेनेजची अवस्था अतिशय वाईट आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने यावर कोणतीच प्रभावी उपाययोजना केलेली नाही. दोन इमारतीमधील असणाऱ्या बोळीमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग नाही शिवाय त्यांच्याकडे आवश्यक ती साधन सामग्री नाही. या वसाहतीमध्ये राहणारे पोलीस कर्मचारी प्रसंगी चोवीस तास काम करीत असतात. त्यांना घरातील समस्यांकडे लक्ष देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याकडे देखील समितीने लक्ष देऊन माहिम पोलीस वसाहतीमधील लिकेज, कचरा व इतर अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा अशी समितीला विनंती करण्यात आली.

समितीला अशी माहिती देण्यात आली की, म्हाडाने बांधलेल्या इमारतीपैकी १४ इमारती माहिम पोलिस वसाहतीस दिलेल्या आहेत. या ठिकाणी असणाऱ्या ओएनजीसी आणि सीपीडब्ल्युडीच्या इमारती आणि माहिम पोलीस वसाहतीच्या इमारतीमध्ये खूपच फरक आहे. माहिम पोलीस वसाहतीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष दिलेले नाही. या ठिकाणी असणाऱ्या इमारतींचा ताबा म्हाडाकडून घेतल्यानंतर माहिम पोलीस वसाहतीमध्ये बांधलेल्या इमारतीचे आयुष्य किती आहे याचा देखील विचार करण्याची गरज होती.

सदर इमारती किती वर्षे टिकतील? अशी समितीने विचारणा केली असता यावर अधिक्षक अभियंता यांनी सांगितले की सदर इमारतींचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाने १९७८ ला घेतलेला होता. माहिम पोलीस वसाहतीमध्ये दैनंदिन दुरुस्ती केली पाहिजे. यामध्ये मोठ्या दुरुस्तीची कामे आहेत. याकरिता २००७ मध्ये पोलीस विभागाने काही निधी दिलेला होता. परिणामी त्यावेळी दुरुस्तीची कामे करण्यात आली होती. तद्नंतर पोलीस विभागाने एक पत्र दिलेले असून, त्यात असे म्हटलेले आहे की, खराब आणि मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती आता करण्यात येऊ नये. त्यामुळे दुरुस्तीची कामे करण्यात आलेली नाहीत. येथील देखभाल दुरूस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे एक कारपेंटर, एक मिस्त्री, एक प्लंबर आणि ७ लेबर असून आतापर्यंत ७ इमारतींची दुरुस्ती केलेली आहे. सदर इमारतींची दुरुस्ती सन २००७ मध्ये केलेली आहे. सहायक अभियंता यांनी असे सांगितले की, सदर इमारती जास्त प्रमाणात मोडकळीस आल्यामुळे व त्या ठिकाणी खाजगीकरणांतर्गत नवीन इमारती बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन असल्यामुळे सदर इमारतींच्या दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आलेला ४.६३ कोटी रुपयांचा निधी इतर इमारतींमधील अतिरिक्त कामासाठी वापरण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर ४.६३ कोटी रुपयांचा इमारतींमधील अतिरिक्त कामासाठी खर्च केल्यानंतर सुध्दा इमारतींची अवस्था अतिशय वाईट आहे. या ठिकाणी शंका येण्यास वाव आहे. सदर खर्च चार वर्षापूर्वी केलेला असून आता त्या ठिकाणच्या इमारतींची अवस्था अतिशय वाईट आहे. प्रत्येक इमारतींचे आयुष्य ठरलेले असते. सदर इमारतींचे आयुष्य किती वर्षाचे आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सहाय्यक अभियंता यांनी सांगितले की, सदर इमारती विकासक श्री. शिर्के यांनी बांधून हस्तांतरित केल्या होत्या. त्यानंतर काही काळातच गळतीचा प्रश्न सुरु झाला. गळतीचा प्रश्न आजतागायत सुटलेला नाही. त्या ठिकाणी दरवाजे वगैरे किरकोळ दुरुस्त्यांची कामे केलेली आहेत. रू. ४.६३ कोटी खर्च करुन देखील लिकेजचा गळतीचा प्रश्न सुटलेला नाही. दुरुस्ती करताना गळती बाबतीत कोणती कार्यवाही केलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता सहायक अभियंता यांनी सांगितले की गळती होऊ नये याकरिता केमिकल बाऊंडींग वगैरे प्रोसिजर अवलंबिण्यात आली होती. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लिकेजचा प्रॉब्लेम मूळापासून काढलेला नाही. विभागाने फक्त तात्पुरती डागडुजी केलेली आहे. लिकेजचा प्रॉब्लेम दूर करण्याकरिता विभागाने ३ इंचाचा स्लॅब टाकला पाहिजे होता. ३ इंचाचा स्लॅब टाकला असता तर लोड अधिक झाला असता. विभागाने लिकेज दूर करण्याकरिता प्रोसिजरप्रमाणे कार्यवाही केलेली होती. लिकेज दूर करण्याकरिता केमिकल उपचार (ट्रिटमेंट) प्लॅन केलेला होता व लिकेज होऊ नये याकरिता दोन इंचाचे कॉंक्रीट टाकण्यात आले होते. एवढे करुन देखील लिकेजची समस्या (प्रॉब्लेम) दूर झालेली नाही.

समितीने अशीही विचारणा केली की, पोलीस गृहनिर्माण मंडळाने सन १९८० मध्ये म्हाडाकडून या इमारती विकत घेतलेल्या आहेत. इमारती विकत घेतांना म्हाडा बरोबर ॲग्रीमेंट केलेले आहे का, या इमारतीस आता ३२ वर्षे पूर्ण झालेली आहेत. तुम्ही या इमारतींच्या दुरुस्तीसाठी किती खर्च केलेला आहे.

या इमारतींचे लिकेज काढण्यासाठी कोणते केमिकल वापरण्यात आलेले आहे, तसेच समितीने माहिम पोलीस वसाहतीची पाहणी केली त्यावेळी तेथील रहिवाशांनी समितीला असे सांगितले की, ज्या दिवशी इमारतीची दुरुस्ती करण्यात आली त्याच्या दुसऱ्या दिवसापासून लिकेज सुरु झालेले आहे. याबाबत माहिती देण्यात यावी.

यावर संबंधित अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, लिकेज काढण्यासाठी जॉईंटवर सिकॉलॅटेक्स केमिकल टाकण्यात आले होते. वेळोवेळी लिकेजची समस्या सोडवण्यात येते. इमारतीच्या दुरुस्तीच्या कामावर पहिल्या टप्प्यामध्ये २,९३,०४४/- रुपये खर्च करण्यात आला आहे. आता इमारतीच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी ८३ लाख रुपये निधी मंजूरझालेला आहे. त्यापैकी ३ कोटी ४६ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, म्हाडाकडून इमारती विकत घेतलेल्या आहेत. त्यावेळी ॲग्रीमेंटमध्ये कोणत्या अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या होत्या ? या इमारतीस आता ३२ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आता या इमारतींचे लाईफ संपलेले आहे. त्यामुळे या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामावर खर्च करु नये, म्हाडाने श्री.शिर्के नावाच्या बिल्डरकडून या इमारती बांधून घेतलेल्या आहेत. त्यामुळे इमारतींच्या बाबतीत संपूर्ण लायबलिटी त्यांची आहे. या इमारती आता दुरुस्तीच्या पलीकडे गेलेल्या आहेत असा निष्कर्ष तुम्ही कसा काय काढलेला आहे? श्री.शिर्के यांनी या इमारतींची किती वर्षाची गॅरंटी दिलेली आहे ? समितीने पोलीस वसाहतीची पाहणी केली त्यावेळी समितीला असे आढळून आले की, या इमारतीमध्ये पशु सुध्दा राहू शकत नाहीत. तुम्ही पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सदनिका दिलेल्या आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या पगारातून प्रत्येक महिन्याला ३० टक्क्याप्रमाणे घरभाडे भत्ता कपात केला जातो. परंतु या इमारतींची दुरुस्ती केली जात नाही. समितीने ज्यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरामध्ये जाऊन पाहणी केली त्यावेळी त्यांच्या घरामध्ये उबट, आंबट वास येत होता. या इमारतीमध्ये राहणारे पोलीस अक्षरश: नरक यातना भोगत आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या पगारातून प्रत्येक महिन्याला ३०% घरभाडे भत्ता कपात केला जातो. परंतु इमारतींची दुरुस्ती केली जात नाही. या इमारतींचे लाईफ किती आहे याचे उत्तर सुध्दा संबंधित अधिकारी देऊ शकत नाहीत. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. यावर पोलीस उपायुक्त यांनी सांगितले की, या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

विभागाने समितीला दिलेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, लेखी माहितीमध्ये असे नमूद केलेले आहे की, "सह पोलीस आयुक्त यांनी सदर इमारतींची खाजगीकरणाने पुनर्बांधणी करावयाचा प्रस्ताव विचाराधीन असल्यामुळे या इमारतीचे काम टप्पा क्र.३ मधून करु नये असे निर्देश दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिल्यामुळे ही कामे हाती घेण्यात आली नाहीत." इमारती म्हाडाकडून विकत घेण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये एकूण १,३४४ सदनिका आहेत. या इमारतीपासून समुद्र जवळ आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे या इमारतींची दुरावस्था झालेली आहे. १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. ही

जागा शासनाच्या नावावर आहे. ही जागा पोलीस विभागाच्या नावावर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ही जागा ९९ वर्षाच्या लिजवर घेण्यासाठी आणि ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठीचा प्रस्ताव डी.जी. (हाऊसींग) यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. असे पोलीस उपआयुक्त यांनी समितीला सांगितले.

याबाबत समितीने असे मत व्यक्त केली की, समितीला अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. एखाद्या वास्तूची खरेदी केल्यानंतर त्या वास्तूचे लाईफ ठरविण्यात आलेले असते. ती वास्तू जर तेवढी वर्षे टिकली नाही तर संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. श्री.शिर्के यांनी या इमारतींचे बांधकाम केलेले आहे. तुम्ही या इमारतींच्या दुरुस्तीच्या कामावर ४ कोटी ६४ लाख रुपये खर्च केलेले आहेत. हा सर्व खर्च वाया गेलेला आहे. आपण सांगत आहात की, खाऱ्या पाण्यामुळे इमारतीची दुरवस्था झालेली आहे. संपूर्ण मुंबई शहर समुद्राच्या जवळ वसलेले आहे. पोलीस वसाहतीच्या बाजूलाच ओएनजीसी व सीपीडब्ल्यूडीच्या तीन इमारती आहे. त्या इमारती चांगल्या आहेत. त्या इमारतींमध्ये लिकेज नाही. परंतु पोलीस वसाहतींच्या इमारतीमध्ये मात्र लिकेज आहे. ओएनजीसीच्या व सीपीडब्यूडीच्या तीन इमारतींचे बांधकाम सुध्दा श्री.शिर्के यांनीच केलेले आहे. त्या इमारतींमध्ये लिकेज नाही आणि पोलीस वसाहतीच्या इमारतींमध्ये मात्र लिकेज आहे. जॉईंट असल्यामुळे लिकेज निघत नाही, मग श्री.शिर्के यांनीच बांधलेल्या ओएनजीसीच्या इमारतींमध्ये लिकेज का नाही? श्री.शिर्के यांच्याकडून इमारती बांधून घेतलेल्या आहेत. इमारतींची दुरुस्ती होत नाही, लिकेज निघत नाही असे पत्र श्री.शिर्के यांना का लिहिले नाही. याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करुन व या इमारतींची दुरुस्ती करण्यात आली त्यावेळी कोणते अधिकारी कार्यरत होते ?अशी विचारणा केली असता सन २००७ मध्ये या इमारतींच्या दुरुस्तीच्या कामावर ४ कोटी ६४ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्यावेळी कार्यरत असणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. श्री.शिर्के यांनी ३२ वर्षापूर्वी या इमारतींचे बांधकाम केलेले आहे. या इमारती वाईट अवस्थेमध्ये आहेत. त्यामुळे श्री.शिर्के यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले व इमारती विकत घेतांना जे ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे त्याची एक प्रत समितीला देण्यात यावी, असे समितीने सांगितले.

पोलीस वसाहतीच्या बाजूला ओएनजीसीच्या इमारती आहेत. त्या इमारतींचे लिकेज निघते आणि पोलीस वसाहतीच्या इमारतींचे लिकेज निघत नाही असे कसे काय होऊ शकते? ओएनजीसीच्या इमारतींमध्ये लिकेज का निघत नाही? यासंदर्भात समितीला सांगण्यात आले की, ओएनजीसीच्या इमारतीमध्ये राहणारे रहिवाशी काळजी घेतात. तेथील रहिवाशी इमारतीच्या बाहेर पाणी, कचरा टाकत नाहीत. सन २००७ मध्ये पोलीस वसाहतीच्या इमारतींची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यावेळी जे संबंधित अधिकारी कार्यरत होते त्यांची चौकशी करुन समितीला अहवाल सादर करावा. तसेच, त्यावेळचे अधिकारी आता कार्यरत असतील तर त्यांची माहिती समितीला द्यावी. तुम्ही ज्यावेळी या इमारती ताब्यात घेतल्या त्यावेळी या इमारतींचे लाईफ किती होते, या इमारती किती वर्षे टिकणार आहेत, श्री.शिर्के या

इमारतींची जबाबदारी किती वर्षे घेणार आहेत? या इमारतींचे लिकेज निघू शकत नाही असे तुम्ही तुमच्या विभागास कळवावयास पाहिजे होते. इमारतीच्या स्ट्रक्चरमध्ये दोष निर्माण झालेला असेल, श्री.शिर्के यांचे इमारत बांधकामाचे टेकनिक चुकलेले असेल तर त्यांना तसे कळवावयास पाहिजे होते. इमारतीमध्ये जे दोष आहेत ते संबंधित अधिकाऱ्यांनी श्री.शिर्के यांना का दाखवून दिले नाहीत? इमारतींचे लिकेज निघणार नाही हे लक्षात आल्यानंतर या इमारतींची दुरुस्ती का केली? श्री.शिर्के यांना का विचारणा केली नाही? यासाठी संबंधित विभाग जबाबदार आहे. इमारतींचे शंभर टक्के लिकेज निघू शकत नाही असे अधिकारी कशाच्या आधारावर सांगत आहेत ? अधिकाऱ्यांनी समितीसमोर विचारपूर्वक उत्तर दिले पाहिजे. संबंधितांना तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण द्यावे लागेल. इमारतींचे लिकेज निघू शकत नाही तर मग इमारतींच्या दुरुस्तीच्या कामावर खर्च का केला, अशा अनेक प्रश्नांची संबंधित अधिकारी समर्पक उत्तरे देवू न शकल्याने समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या पगारातून ४ हजार रुपये घरभाडे भत्ता कपात केला जातो. एका महिन्याला ५४ लाख रुपये जमा होतात. म्हणजे एका वर्षाला ६ कोटी ५० लाख रुपये जमा होतात. मागील २०-२५ वर्षामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या पगारातून घरभाडे भत्त्यापोटी किती रक्कम कपात करण्यात आलेली आहे? या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामावर आतापर्यंत ४ कोटी ६४ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या पगारातून जी रक्कम कपात केली जाते ती एका वर्षाला ६ कोटी ५० लाख रुपये इतकी होते. ही सक्तीची वसुली आहे. म्हाडाबरोबर जे करारनामा केलेला आहे त्याची प्रत समितीला देण्यात यावी. तसेच, श्री.शिर्के यांनी इमारतीच्या गॅरंटी संदर्भात दिलेल्या कागदपत्रांची कॉपी देखील समितीला देण्यात यावी. या इमारती जर धोकादायक असतील तर या इमारती ताबडतोब धोकादायक असल्याचे जाहीर केले पाहिजे. गृह निर्माण विभागाच्या दिनांक ११ जुलै, २००८ रोजीच्या पत्रामध्ये मुंबई पोलीस गृहनिर्माणाच्या बांधकामा संदर्भात मार्च, २००८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रु.१२४.१३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला असताना आता या ठिकाणी रि-डेव्हलपमेंट करत आहात. ही म्हाडाची जागा असून त्याची मालकी ही राज्य शासनाची आहे. सदर काम ९९ वर्षाच्या लीजवर करावयाचे होते असे असताना टॉसिंग ऑफ दी फाईल_कशासाठी करण्यात आला. अशी समितीने विचारणा केली असता याबाबत खुलासा करताना विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, माहीम पोलीस वसाहतीमध्ये एकूण १४ इमारती आहेत. त्यामध्ये एकूण १३४४ सदनिका आहेत. माहीम पोलीस वसाहतीमधील १२ इमारतींसाठी तातडीने ४८ लक्ष रुपयांची कामे विविक्षीत दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेली आहेत. पहिल्या टप्प्यात २५० निवासस्थाने आहेत. त्यामध्ये एकूण ५०० सदनिका आहेत. लीजवर घेण्याकरिता ही जमीन गृह विभागाच्या नावावर नाही. यामध्ये म्हाडा आणि पोलीस विभाग यांचे प्राधिकरण असून ते राज्य शासनाचे आहे. याकरिता म्हाडाच्या व्ही.पी.बरोबर बैठकीचे आयोजन करुन सदर प्रश्न तात्काळ सुटण्यास मदत होईल.

पोलीस वसाहतीत रहाणाऱ्या पोलिसांकडून जमा करण्यात आलेला निधी दुरुस्तीवर किती खर्च केला आहे? असा समितीने प्रश्न केला असता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी सांगितले की, पोलिसांच्या पगारातून कपात करण्यात आलेला पैसा हा सेंट्रल फंडमध्ये जमा झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला जातो. पोलीसांच्या पगारातून शहरी, नागरी व ग्रामीण विभाग याप्रमाणे अनुक्रमे ३० टक्के, २० टक्के आणि १० टक्के दुरुस्तीसाठी पैसा कापला जातो. यामध्ये प्रत्येक स्के.फु. किती पैसा असावा त्याची रक्कम ठरलेली आहे. यामध्ये रेशोप्रमाणे पैसे वर्ग होत असतात. पोलीसांच्या पगारातून ४ हजार रुपयांची कपात केली जाते मागील ३१ वर्षात किती पैसे जमा झालेले आहेत? अशी समितीने विचारणा केली असता पोलिसांच्या पगारातून कपात करण्यात आलेला पैसा हा सेंट्रल फंडमध्ये जमा

झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला जातो. पोलिसांच्या पगारातून कपात होणारी एकूण रक्कम किती जमा होते यासंदर्भातील माहिती समितीला देण्यात येईल असे आश्वासन समितीला देण्यात आले. इमारत क्रमांक - २ अ, माहिम पोलीस वसाहत येथे इलेक्टॉनिक मीटर रुमची पुर्न:बांधणी करण्याबाबत मुख्याध्यापिका, उ.प्रा.म.शा.व (इमारत नंबर २ अ) यांना पत्र दिलेले आहे. इमारत क्रमांक - २ अ, माहिम पोलीस वसाहत येथे इलेक्टॉनिक मीटररुमधील मे.बीईएसटी ची सर्व्हिस जुनी झालेली आहे. तसेच सदर इलेक्टॉनिक मीटररुममध्ये प्लॅस्टर निखळल्यामुळे त्या आता धोकादायक अवस्थेत आहे. सदर कामे करण्यासाठी मे.बीईएसटीने विद्युत पुरवठा खंडित करणे, विद्युत विभागाने तेथील स्विचगिअर्स व मेन्स काढणे, स्थापत्य विभागाने इलेक्टॉनिक मीटररुमची पुर्न:बांधणी अथवा प्लॅस्टरिंग करणे, मे.बीईएसटी यांनी सर्व्हिस पुर्न:बांधणी करणे, विद्युत विभागाने नवीन स्विचगिअर्स व मेन्स लावणे, मे.बीईएसटी यांनी विद्युत पुरवठा करणे वगैरे कामे करण्यात येणार आहे. सदर कामे तीन आठवड्याच्या आत पूर्ण केली जातील. सदर ठिकाणी पावसाळ्यात पाणी साचत असल्यामुळे केबिनमध्ये लावण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक मीटर किमान चार फुट उंचिवर बसविले पाहिजेत. परिणामी शॉर्ट सर्किट होणार नाही, तसेच त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांची अवस्था अतिशय वाईट आहे, हे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. तसेच पत्रव्यवहार करताना इंग्रजीमधुन न करता मराठीतून करावा अशी समितीने सुचना केली.

माहिम पोलीस वसाहतीमधील १४ इमारतींसाठी फक्त दोनच सफाई कामगार आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता, पोलीस वसाहतीचा मेन्टेनन्स सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केला जातो. पोलीस विभागाने जो मेन्टेनन्स करावयाचा आहे तो पोलीस विभागाने केला पाहिजे. परंतु पोलीस विभागाचे लोक सुध्दा मेन्टेनन्स करण्यामध्ये कमी पडतात. १५ दिवसामध्ये याबाबतचा कार्यक्रम तयार करण्यात येईल असे समितीला सांगण्यात आले.

समितीने माहिम पोलीस वसाहतीची पाहणी केली असता तेथील महिलांकडून समितीला सांगण्यात आले बाजूच्या झोपडपट्टीतील लोक येथे येऊन दारु पितात, उघड्यावर शौचालयास बसतात. बाजूच्या

झोपडपट्टीमध्ये राहणारे लोक जर येथे येऊन दारु पिणार असतील, उघड्यावर शौचालयास बसत असतील तर त्या लोकांना पोलिसांचा धाक असला पाहिजे. वरच्या मजल्यावर राहणारे लोक खाली कचरा टाकतात. या वसाहतीतील रहिवाशांना सर्व सोईसुविधा मिळाल्या पाहिजे. तुम्हाला वरिष्ठ अधिकारी चांगले लाभलेले आहेत. त्यामुळे तुम्ही सुध्दा चांगले काम करुन दाखवावे आणि माहिम पोलीस वसाहतीमधील सर्व साफसफाई करण्यात यावी अशी समितीची भावना आहे.

दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने गृह विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती खालीलप्रमाणे आहे :-

माहीम खाडी शेजारील जमिनीवर नविन पोलीस वसाहतीतील १९ इमारतींचे बांधकाम म्हाडा मार्फत १९७८ साली पूर्ण करण्यात आले. ह्यापैकी १४ इमारती (इमारत क्र .१, २, ३, ४, ७, ८, ९, १३, १४, १५, १६, १७, १८, १९) गृह विभागाने पोलीस निवासस्थानासाठी त्यावेळी म्हाडाकडून विकत घेतल्या आहेत. उर्वरीत १९७८ साली ताब्यात आहेत. या इमारतीचे बांधकाम मे.शिर्के अँड कंपनी मार्फत १९७८ साली करण्यात आले असून सदरील बांधकामात पूर्वरचित प्रीकास्ट बीम्स कॉलम्स स्लॅब व ब्लॉक्स इत्यादीबाबतचा वापर केलेला आहे.

सदर इमारती तळ अधिक ५ मजले अशा स्वरुपाच्या असून प्रत्येक इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर १६, अशी एकूण ९६ निवासस्थाने आहेत. एकूण निवासस्थानांची संख्या १३४४ इतकी आहे. प्रत्येक सदनिकेमध्ये बैठकखोली, स्वयंपाकघर, स्नानगृह, प्रसाधनगृह व सामाईक व्हरांडा यांचा समावेश असून सदर इमारत ही पूर्वरचित (प्रिकास्ट) तंत्रज्ञानाने बांधण्यात आल्या असल्याने सर्व ठिकाणी सांध (जॉइंट) आहेत. इमारतीभोवती संरक्षक भिंती नसल्यामुळे या परिसरातून अनधिकृत व्यक्तींची सतत ये-जा चालु असते.

सदर इमारतींचे बांधकाम होऊन जवळपास ३२ वर्षे पूर्ण झाली असून बाह्य गिलाव्याला तडे गेल्याने ओल्याव्यामुळे पाणी सतत आत येऊन सळयांना गंज पकडून सळयांचा व्यास वाढल्यामुळे कॉक्रीटच्या पृष्ठभागावर तडे जाऊन या इमारती कमकूवत झाल्या आहेत.

प्रसाधनगृहाच्या सिपोरेक्स स्लॅब हा पुर्वरचित पॅनलचा असल्याने त्यांच्या सांच्यातून गळती सुरु झाली असून अन्य ठिकाणी खालील नमूद कारणांमुळे विविध ठिकाणी गळतीचा प्रादर्भाव दिसून येत आहे.

१) स्वयंपाक गृहातील नहानी ट्रॅप हा खोलीच्या जमीनीच्या पातळीवर असून त्यामुळे त्यातून सांडपाण्याचा विसर्ग व्यवस्थीत होत नाही.

२) स्वयंपाकगृहामध्ये रहीवाशी कपडे धुणे, लादी पाण्याने धुणे, वाशिंग मशीनचे पाणी स्वयंपाक गृहामध्ये सांडणे असे प्रकार सर्रास सुरु असून यामुळे बांधकामाच्या सांध्यामधून गळतीचा प्रादुर्भाव होऊन छत (स्लॅब) कमकुवत झाले आहेत.

३) या इमारतीचे बांधकामास ३२ वर्षे पूर्ण झाली असून भिंतीसाठी वापरण्यात आलेले पोकळ काँक्रीट ब्लॉक ही तितकेच जुने असल्याने या पोकळ ब्लॉकमध्ये पावसाचे पाणी झिरपून आतील भिंतीना ओलावा येण्याचे प्रकार पावसाळयात विशेषत्वाने दिसून येत आहेत.

४) या इमारतीचे छतास दोन्ही बाजूस उतार असून छतास पॅरापेट भिंत अथवा छज्जा नसल्याने तसेच रेन वॉटर पाईप नसल्याने छताचे पडणारे पावसाचे पाणी, भिंतीवरून ओघळून कॉलम, बिम व भिंतीच्या सांध्यातून आत झिरपण्याचे प्रमाण सतत पावसाळयात सुरु असते पर्यायाने ब्लॉकची झीज होऊन ओलावा प्रमाण दिवसेंदिवस वाढले आहे.

५) या इमारतींना सामाईक व्हरांडा असून व व्हरांडासमोर कठडे असून व व्हरांडातून पावसाचे पाणी व्हरांड्यातील फरशीवर पडून प्रथम फरशिच्या सांध्यातून व नंतर पोकळ काँक्रीट ब्लॉकच्या सांध्यातून झिरपत असल्याने काँक्रीटला तडे जाऊन बऱ्याच ठिकाणी छताच्या सळया उघडया पडल्या असून छत कमकूवत झाले आहेत.

या अनुषंगाने वरील प्रमाणे सर्व बाबींसह दुरुस्ती होणे आवश्यक होती. व त्या अनुषंगाने पोलीस दुरुस्ती टप्पा क्र.१ ते ३ मध्ये इमारत क्र.२ व ३, ९,१३,१५,१६ या १४ इमारतींपैकी सहा इमारतींची दुरुस्ती जुलै २००७ अखेर पूर्ण करण्यात आलेली आहे. या दुरुस्तीच्या कामामध्ये प्रामुख्याने सिमेंट गिलावा, लादी नुतनीकरण, दरवाजे खिडक्या, लोखंडी जाळी, पाणी वाहक नलिका, पॉलीमर सिमेंट गिलावा, संकिर्ण कामे, गटार लाईनचे नुतनीकरण, जल गळती रोधक काम करणे, विट बांधकाम, स्वयंपाक ओटा इ. बाबींचा अंतर्भाव आहे. या दुरुस्तीच्या कामामध्ये प्रसाधनगृहाची दुरुस्ती/नुतनीकरण व जलरोधक प्रक्रिया करणेच्या बाबींची व्याप्ती एकूण कामाच्या साधारणपणे ९ टक्के इतकीच आहे. या सर्व कामावर एकूण ४६३.०० लक्ष इतका खर्च करण्यात आला होता. या सर्व कामांची तपासणी सा.बां. विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रक मंडळामार्फत वेळोवेळी करण्यात आली असून सदरील कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्यात आली आहेत.

उर्वरीत ८ इमारतीपैकी ७ इमारतींचा (इमारत क्र .१, ४, ७, ८, १४, १८, १९) दुरुस्तीसाठी गृह विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी रु. ४,६२,२१,४७३/- ह्या रकमेस टप्पा क्र.३ मध्ये प्रशासकीय मान्यता सुध्दा प्राप्त झाली होती. परंतु नंतर मा.सह पोलीस आयुक्त यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.पोआ/सहपोआ(प्रशा)/पीए/२३९/०७ दिनांक ३०/१०/२००७ नुसार सदर इमारतीत मोठया प्रमाणात दुरस्ती आवश्यक असल्याने, सदर इमारतींचा पुनर्विकास करणेचा प्रस्ताव विचारधीन असल्यामुळे टप्पा क्र.३ मध्ये वरील ७ इमारतींची कामे हाती घेऊ नये असे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने वरील इमारतींची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.

या ७ इमारतींच्या पुर्नबांधनीच्या स्थितीबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय) यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.५८८१ दिनांक ०५/११/२०११ अन्वये, माहीम येथील सर्व १४ इमारतींच्या पुर्नःबांधणीसाठी १३.०० कोटी इतका निधी शासनाकडून प्राप्त झाला असून

जमीन अद्यापी म्हाडाकडून गृहविभागाकडे हस्तांतरीत झाली नसल्याने कळविले आहे. सन २००७ नंतर आजमितीस ४ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यामुळे व या कालावधीत पुर्नविकास प्रस्तावामुळे या इमारतीमध्ये मोठया स्वरुपाच्या दुरुस्ती न केल्यामुळे सद्यःस्थितीत इमारत क्र.१,४,७,८,१४,१५,१८,१९) ह्या इमारती अत्यंत कमकुवत झाल्या असून या इमारतींच्या सर्वकष दुरुस्तीस अंदाजे रु.१४.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

अंदाज समितीच्या मा.सदस्यांनी निर्देश दिल्याप्रमाणे उप विभागीय अभियंता, उत्तर उपविभाग, दादर यांचे पत्र क्र.९६३ दिनांक २८/०९/२०११ अन्वये म्हाडाकडून गृह विभागाने इमारती ताब्यात घेतल्या वेळीच्या करारनाम्याची प्रत उपलब्ध करुन देण्याची पोलीस आयुक्त कार्यालयास विनंती केली असता सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय) यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.५८८० दिनांक ५/११/२०११ अन्वये सदरील करारनाम्याची प्रत त्यांचे कार्यालयीन अभिलेख्यावर उपलब्ध नसून याबाबत म्हाडाकडे पत्रव्यवहार करण्यास सुचविले. म्हाडाकडे याबाबतीत पत्रव्यवहार चालू आहे.

या वसाहतीमधील किरकोळ स्वरुपाची दैनंदिन व देखभाल दुरुस्तीची कामे सा.बां.विभागामार्फत करण्यात येतात. माहीम येथील नविन पोलीस वसाहतीसाठी सन २०११-१२ या कालावधीसाठी सा.बां. विभागाच्या विविक्षित दुरुस्ती कार्यक्रमातून रु. ४८.०० लक्ष रक्कमेच्या कामास मान्यता मिळालेली असून सदरील कामे निविदा स्तरावर आहेत.

विद्युतीकरणाच्या कामांबाबत इमारत क्र.३ असे इमारतीमध्ये अनेक ठिकाणी लोंबकळत असणाऱ्या इलेक्ट्रिक वायर्स व्यवस्थित करुन काम पूर्ण करण्यात आलेल्या आहे. व इमारत क्र.२ अे माहिम पोलीस वसाहत येथे समितीने सूचविल्यानुसार इलेक्ट्रीकल मीटर रुममध्ये प्लास्टर करुन, बी.ई.एस.टी. कडून विद्युत पुरवठा पूर्ववत करुन घेण्यात आला आहे. तसेच नवीन स्विचगिअर व मेन्सचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदर परिसराची साफसफाई पोलीस विभागाकडून होणे आवश्यक आहे तथापी साफसफाईसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने परिसराची साफसफाई व्यवस्थित होत नाही. पोलीस खात्याकडून सफाई कामगारांकडून योग्य प्रकारे साफसफाई ठेवल्यास तेथील वातावरण आरोग्यदायी राहील व रहिवाश्यांना जीवनमान सुसह्य होईल. तसेच सदर वसाहतीची चर्तुसिमा निश्चित केलेली नाही. त्यामुळे ज्या भागात झोपडपट्टी वसाहत आहे तिकडून झोपडपट्टीवासियांचे कॉलनीतून ये-जा सुरु राहते. यास्तव वसाहतीस संरक्षक भिंत करणे आवश्यक आहे.

समितीने माहिम पोलीस वसाहतीला दिलेल्या भेटीच्या वेळी आढळून आलेल्या बाबी व विभागास प्राप्त झालेला माहितीच्या अनुषंगाने दिनांक २३ नोव्हेंबर २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीस अशी माहिती दिली की, माहिम पोलीस वसाहतीच्या इमारती १९८० साली पोलीस विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांना घरे देण्यासाठी म्हाडाकडून विकत घेतल्या. उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन सुरुवातीची दहा वर्षे ज्यांनी इमारतीचे बांधकाम केले आहे त्या इमारतीची देखभाल व

दुरुस्ती करण्याची त्यांची जबाबदारी होती. त्यानंतरच्या काळात आवश्यकतेनुसार देखभाल-दुरुस्तीवर पाहिजे तेवढा खर्च झालेला नाही. त्यामुळे कालांतराने या इमारती राहण्यासाठी जवळपास योग्य राहिलेल्या नाहीत. या इमारती पाडून टाकून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याचा निर्णय हाऊसिंग कॉर्पोरेशनने घेतला त्यासाठी त्यांना १३ कोटी रुपये दिले. त्या इमारतीच्या बांधकामाकरिता एजन्सी फिक्स करण्यात आली आहे. त्यामध्ये थोडी अडचण आली असून ती दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता मुंबई महानगरपालिकेकडून मान्यता घ्यावी लागेल, ती घेण्याकरिता सदरच्या जमिनीची कन्वेअन्स गृह विभागाच्या नावे असले तरी मुंबई म्हाडा व मुंबई पोलीस यांच्यामध्ये लिज डीड झाले आहे.

त्यावर समितीने अशी विचारणा केली या इमारतीचे बांधकाम २५ ते ३० वर्षे झाल्यानंतर आपण त्या पाडून तेथे नविन इमारत बांधावयास घेणार आहात इमारतीला ३० वर्षे झाल्यानंतर त्या इमारती पाडावयास नको हे खरे आहे. तेथील जागेवर १९ इमारती बांधण्यात आल्या होत्या, त्यापैकी १४ इमारती गृह विभागाने घेतल्या होत्या. बाकीच्या इतर ५ इमारती अन्य लोकांच्या ताब्यात आहेत त्या चांगल्या स्थितीत आहेत. या इमारतींचे मेंटेनन्स वेळोवेळी झाले असते तर या इमारती देखील चांगल्या स्थितीत राहिल्या असत्या. संबंधित बिल्डरचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे या इमारती मोडकळीला आल्या असे सांगितले जाते.यावर समितीने अशी विचारणा केली की, सर्वसामान्य माणसाला फसविण्याचे प्रकार नेहमी घडत असतात याठिक्राणी पोलिसांना फसविल्यानंतर देखील संबंधिताविरुध्द कारवाई कां होत नाही? अशी समितीने विचारणा केली असता. संबंधित बिल्डरकडून या इमारतीचे बांधकाम कमकुवत झाले असे सांगितले जात असेल तर त्याच बिल्डरकडून दुसऱ्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारती खराब झाल्या असत्या. प्रश्न एवढाच आहे की, दुसऱ्या ठिकाणी असलेल्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती चांगल्या प्रकारे झाली असल्यामुळे त्या सुस्थितीत आहेत. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर किती वर्षानंतर त्या इमारतीचे मेंटेनन्स सुरु होते? शासनाच्या इतर विभागाच्या इमारतीमध्ये प्लॅस्टरींग, गनायटींग,रिपेअरींगची कामे सतत सुरु असतात. एखाद्या खाजगी बिल्डरने इमारत बांधून दिल्यानंतर २० वर्षानंतर त्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु होते. परंतु या ठिकाणी आपण २०-२५ वर्षानंतर या इमारती तोडण्यास निघाला आहात. गेल्या तीस वर्षामध्ये इमारतीचे मेंटेनन्स न केल्यामुळे या इमारती पडण्याच्या अवस्थेत आहेत. १४ इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीवर खर्च झालेला आहे. देखभाल व दुरुस्तीवर खर्च करणाऱ्या एजन्सीची यामध्ये चूक होती का हे सुध्दा तपासले पाहिजे याचा शोध घेणे गरजेचे आहे.शिवाय चुकीच्या पध्दतीने दुरुस्ती करण्यात आली आहे का ? ज्या कॉट्रॅक्टरने म्हाडाचे काम केले आहे त्याच कॉट्रॅक्टरने खाजगी इमारतीचेही बांधकाम केले आहे त्या इमारती चांगल्या अवस्थेत आहे असे कां? अशी समितीने विचारणा केली असता. यावर अप्पर मुख्य सचिवांनी अशी माहीती दिली या इमारतींचे बांधकाम बॉम्बे बिल्डिंग रिपेअर अँन्ड रिकंस्ट्रक्शन बोर्ड यांचेमार्फत केले होते. त्या काळात बी.जी. शिर्के आणि कंपनीला १९ इमारतींच्या बांधकामाचे कंत्राट

दिले होते. या १९ इमारतीमधील १८२४ सदनिकांपैकी १४ इमारतीमधील १३४४ सदनिका विभागाने विकत घेतल्या. मुळात बांधकाम सदोष असते तर संपूर्ण इमारत खराब झाली असती, त्यामधील घरे खराब झाली असती. सदनिका घेतल्यापासून पुढील दहा वर्षे त्या इमारतींचे मेंटेनन्स करण्याची जबाबदारी त्यांची होती. त्यानंतर ती जबाबदारी पोलीस गृहनिर्माण विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने पार पाडणे आवश्यक होते. परंतु त्यांच्याकडून मेंटेनन्सचे म्हणावे तेवढे चांगले काम झालेले नाही म्हणून या इमारतींची अवस्था वाईट झालेली आहे.

सदर इमारती एकूण किती रक्कमेला खरेदी करण्यात आल्या अशी समितीने विचारणा केली असता प्रत्येक टेनामेंटच्या खरेदीसाठी २७ हजार ७५ रुपये देण्यात आले होते. एकूण ४ कोटी २७ लाख इतक्या रकमेला इमारती खरेदी केल्या. या इमारती जेवढ्या किमतीच्या खरेदी करण्यात आल्या त्यापेक्षा इमारतीच्या दुरूस्तीचा खर्च जास्त होऊन त्या वाईट अवस्थेत आहेत असे समितीने मत व्यक्त केले.

इमारतींच्या रिपेअरींगवर ५ कोटी रुपये खर्च झाले आहेत तर मग कोणत्या प्रकारचे रिपेअरींग करण्यात आले, ते पैसे गेले कुठे? इमारती विकत घेतल्या त्यावेळी त्या इमारतींचे आयुष्यमान किती वर्षाचे ठरविण्यात आले ? त्यावेळी केलेल्या ॲग्रिमेंटमध्ये काय म्हटले होते ? अशी समितीने पुन्हा पृच्छा केली असता इमारतींचे ॲग्रिमेंट म्हाडाकडे असून ते त्यांना सापडत नाही, असे महाव्यवस्थापक यांनी सांगितले या इमारती आऊटराईट पर्चेसने खरेदी केल्या. त्यावेळी डिफेक्ट लायाबिलिटी पिरीयड किती वर्षाचा होता याबाबत गृह विभागाने म्हाडाकडे व पोलीस आयुक्तांना विचारणा केली असता माहीती मिळाली नाही.

पोलीस वसाहतीतील निवासस्थानामध्ये राहणारे पोलीस कर्मचारी इलेक्ट्रीक बील, पाण्याचे बील स्वतःच भरतात. तरी देखील त्यांना सुविधा दिल्या जात नाहीत. त्यांच्या इमारती मेंटेंन केल्या जात नाहीत, तरी देखील त्यांच्या वेतनातून मेंटनन्सची रक्कम कापली जाते. या समितीच्या प्रश्नावर उत्तर देतांना शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन दिली जातात, त्यास शासन शुल्क लावते. परंतु पोलीस कर्मचाऱ्यांना विभागाकडून निवासस्थाने उपलब्ध करुन दिली जातात. त्यांना कोणत्याही प्रकारचे शुल्क लावले जात नाही. त्या कर्मचाऱ्यांना गृह विभागाकडून निःशुल्क निवासस्थाने उपलब्ध करुन दिली जातात. अशी अप्पर मुख्य सचिवांनी समितीला माहिती दिली.

माहिम येथे पोलीस कर्मचाऱ्यांना दिलेल्या घरांची अवस्था अत्यंत निकृष्ठ आहे. या पोलीस वसाहतीतील इमारतींचे आयुष्यमान किती आहे याची समितीला माहिती दिली गेली नाही. राज्यात अनेक पूल व इमारती बांधल्या आहेत. काही पुलांच्या कामांना १०० वर्षे पूर्ण झाली आहे. त्यांचे आयुष्यमान संपलेले आहे, अजूनही ते पूल आणि इमारती चांगल्या अवस्थेत आहेत. ते पूल चांगल्या स्थितीत असतानाही ब्रिटीशांकडून राज्य शासनाला कळविले जाते की, अमूक अमूक पुलाचे तसेच अमूक अमूक या इमारतीचे आयुष्यमान संपलेले आहे. त्यामुळे सदर पुलाची व इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे राज्य शासनाने पहावीत. व्ही.टी.रेल्वे स्टेशनची इमारत, मुंबई महापालिकेची इमारत यांना १५० वर्षे होऊन गेली

आहेत, तसेच ब्रिटीशांनी बांधलेल्या अनेक इमारती तसेच पूल आजही चांगल्या स्थितीत आहेत. म्हाडाकडून इमारती बांधल्या जातात, त्यांचे आयुष्यमान २० ते २५ वर्षे एवढेच आहे. २५-३० वर्षाच्या कालावधी नंतर त्या इमारतींची अवस्था अतिशय वाईट होते. या बैठकीस म्हाडाचे अधिकारी उपस्थित आहेत, परंतु ते माहिम येथील पोलीस वसाहतीतील इमारतींचे आयुष्यमान किती आहे याची माहिती देऊ शकत नाही तसेच पोलीस विभागाने सदर इमारती म्हाडाकडून घेतल्या आहेत, त्यावेळी इमारती खरेदी संबंधीचा करारनामा केला गेला आहे. त्या "करारनाम्याची प्रतच सापडत नाही" अशा प्रकारची म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती दिली गेली. ज्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या कागदपत्रांची माहिती नाही, ज्या अधिकाऱ्यांकडून महत्वाची अशी कागदपत्रे गहाळ होतात, अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. त्या कंपनीने इमारतींचे बांधकाम नित्कृष्ट प्रतीचे केले असल्याने पोलीस विभागाने त्यांच्यावर वेळीच कारवाई का केली नाही? उलट पोलीस विभागाने सदर इमारतींच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. त्या रक्कमेत देखील सदर इमारतींची दुरुस्तीची कामे झालेली दिसून येत नाही. या इमारती बी.ओ.टी.तत्वावर नव्याने बांधावयाचा विभागाचा विचार आहे. शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुन तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचा काहीही लाभ देणार नसाल, त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा देणार नसाल तर कशासाठी हा निधी खर्च करण्यात येत आहे. म्हाडा आणि शिर्के कंपनीने त्या इमारतींमध्ये राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या इन्फ्रास्ट्रक्चर्स उपलब्ध करुन दिलेले नाही.

माहिम येथील इमारती पोलीस विभागाने म्हाडाकडून खरेदी केल्या आहेत. तर त्यासंबंधीचे ॲग्रीमेंट म्हाडा कार्यालयाकडे तसेच पोलीस विभागाकडे असलेच पाहिजे. त्या ॲग्रीमेंटची प्रत साक्षीच्या वेळी सोबत आणावयास पाहिजे होती. एखादा अशिक्षित व्यक्तीने सदनिका खरेदी करण्यासंदर्भात व्यवहार केला तर तो देखील सदनिका खरेदी संदर्भातील ॲग्रीमेट करुन घेतो व त्याची एक प्रत आपणाकडे ठेवत असतो व दुसरी प्रत मूळ मालकाकडे देत असतो. सदर इमारती खरेदी संदर्भातील करारनाम्याची प्रत दोन्ही विभागाकडे उपलब्ध नाही ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. म्हाडाकडे आणि पोलीस विभागाकडे या करारनाम्याची प्रत असलीच पाहिजे. समिती समोर साक्षीला येताना विभागाने संपूर्ण माहिती घेऊन यावयास पाहिजे होते. विशेष म्हणजे सदर इमारती खरेदी संदर्भातील करारनाम्याची प्रत सोबत आणणे अत्यावश्यक होते. समितीने या पोलीस वसाहतीस भेट देऊन चार महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊन गेलेला आहे. तरी देखील इमारतीच्या खरेदी संदर्भातील करारनाम्याची प्रत मिळत नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे.

या वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून तीन टप्प्यात पैसे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात २ कोटी ४३ लाख ८४ हजार रुपये प्राप्त झाले होते. दुसऱ्या टप्प्यात १ कोटी २३ लाख ९३ हजार ६२६ रुपये प्राप्त झाले होते. तिसऱ्या टप्प्यात १ कोटी ३६ लाख ९० हजार २१४ असा एकूण ५ कोटी ४ लाख ३७ हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. त्यापैकी दुरुस्तीसाठी ३ कोटी २ लाख ३९५ रुपये खर्च झालेला आहे. या इमारतींची दुरुस्तीची कामे करुन देखील इमारतींच्या गळती व

इतर अडचणीमध्ये सुधारणा होत नसल्यामुळे या इमारतींच्या पुर्न:बांधणीसाठी शासनाने १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे असे अप्पर मुख्य सचिव यांनी समितीला माहिती दिली. याबाबत समितीने अशी विचारणा केली जेवढया किंमतीमध्ये सदर इमारती खरेदी केल्या, त्यापेक्षा जास्त खर्च या इमारतीच्या दुरुस्तीसाठी झाला आहे. इमारतींची दुरुस्ती न करता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बोगस देयके काढून सदर निधीचा दुरुपयोग केलेला असावा असे समितीचे मत झाले असल्याने या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येईल काय? माहिम येथील या वसाहतींच्या बाजूला ओ.एन.जी.सी.च्या काही इमारती आहेत, त्या इमारतीची देखभाल दुरुस्ती व्यवस्थित होत असल्यामुळे त्या इमारतींची अवस्था अतिशय चांगली आहे. परंतु या पोलीस वसाहतीमधील इमारतींची दुरुस्ती वेळोवेळी न केल्यामुळे त्या इमारतींची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. या इमारतींची दुरुस्तीची कामे न करता फक्त बिलेच काढली गेलेली असावी असे समितीने मत प्रकट केले असता. या १४ इमारतीपैकी ६ इमारतींची दुरुस्तीची कामे जुलै, २००७ अखेर पूर्ण करण्यात आलेली आहेत. या इमारतींच्या दुरुस्तीच्या कामासाठी ४ कोटी ६३ लाख एवढे अनुदान मिळाले होते, ते अनुदान पूर्णपणे खर्च करण्यात आले आहे. इमारत क्रमांक २,३,९,१३,१५,१६ याची दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असून त्या इमारतींची स्थिती चांगली आहे. सद्य:स्थितीत त्या इमारतीमध्ये ५० टक्के पोलीस कर्मचारी वास्तव्य करीत आहेत, असे सार्वजनिक बांधकाम सचिवांनी सागितले.

या इमारतीतील लोकांचीच एक कमिटी बनवून तिच्या मार्फत जे लोक कचरा टाकतात त्यांना १ हजार रुपये दंड किंवा त्यांच्या घरातील पाण्याचे कनेक्शन बंद करणे अशा प्रकारच्या शिक्षा केल्या असत्या तर लोकांनी स्वच्छतेचे पालन आपोआप केले असते. जुन्या इमारतीमधील कचऱ्याचा प्रश्न सुटत नाही मग नवीन इमारती बांधल्यानंतर कचऱ्याचा प्रश्नाचे काय? यावर विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, नवीन बांधकाम करत असताना, या सगळ्या गोष्टींची काळजी घेऊन लवकरात लवकर नवीन बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने गृह विभाग प्रयत्न करील. या १४ इमारतींच्या पुर्नबांधणीच्या कामासाठी ऑलरेडी १३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. करारनामा प्राप्त झाल्यानंतर विभाग कन्व्हेअन्स करुन घेईल. त्यानंतर जमीन गृह विभागाच्या नावावर होईल. नवीन इमारतीच्या बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली तर, बांधकाम पूर्ण होऊ शकेल. मुंबईतील सगळ्या पोलीस वसाहतींच्या देखभाल व दुरुस्तीबाबत प्लान तयार केला जात आहे. या कामासाठी संपूर्ण राज्यासाठी जवळपास १०० कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे. पोलीसांसाठी विभागाकडे राज्यभरात जवळपास १ लाख ६ हजार घरे आहेत. पोलीस वसाहतींतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी चालू वर्षी विभाग अर्थसंकल्पामध्ये १०० कोटी रुपये इतक्या निधींची मागणी करणार आहे. अशा प्रकारे पोलीस वसाहतींची व्यवस्थित देखभाल करण्यासाठी आवश्यक कारवाई विभागाकडून करण्यात येईल.

देखभाल व दुरुस्तीचे काम पोलीस गृहनिर्माण मंडळाला का दिले जात नाही? जर पोलीस गृहनिर्माण मंडळाला हे काम दिले असते तर त्या कामावर तुमचे नियंत्रण राहिले असते व कामे न करणाऱ्यांवर कारवाई देखील करता आली असती. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाला कामे करण्यासाठी पैसे तर द्यायचे तथापि, त्यांनी न केलेल्या किंवा त्रुटी असलेल्या कामांबाबत त्यांच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार गृह विभागास नाहीत. उलट त्यांच्या चुकांबद्दल गृह विभागास उत्तर द्यावे लागते याबद्दल आपले काय म्हणणे आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय अप्पर सचिवांनी असे सांगितले या संदर्भात उच्चस्तरीय चर्चा करण्यात आली असून मुंबई पुरते बोलावयाचे झाल्यास मुंबई शहर परिसरातील पोलीस वसाहतीतील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची कामे पोलीस गृहनिर्माण मंडळाला देण्याबाबत विचार सुरु आहे. राज्यातील इतर भागामध्ये गृह निर्माण मंडळाचा कर्मचारी वर्ग अपूरा असल्यामुळे तेथील पोलीस वसाहतींतील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावे लागेल. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणच्या पोलीस वसाहतींतील इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम पोलीस गृहनिर्माण मंडळाला देण्याबाबतची सुधारणा करता येईल. हे काम पोलीस गृहनिर्माण मंडळ २ टक्के, आर्किटेक्ट ३ टक्के अशा ३ टप्प्यांमध्ये केले जाते. त्यावर समितीने असेही निदर्शनास आणून दिले की, सार्वजनिक बांधकाम विभाग दुरुस्तीचे काम फुकट करीत नाही. उलट न केलेल्या कामाचे बिल लावते. शिवाय त्यांचे चार्जेसही जास्त आहेत. ७ इमारतींच्या पुर्नबांधणीच्या स्थितीबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, गृह विभागाने ही निवासस्थाने खरेदी केली त्यावेळेची रक्कम व अंतिम रक्कम यातील फरकाची रक्कम अद्याप पर्यंत भरणा करण्यात आलेली नाही. त्यासाठी म्हाडाने १ कोटी ७० हजार, ३१२ रुपयांची डिमांड नोट पाठविलेली आहे. या रकमेचा भरणा केल्यानंतर ती जमीन म्हाडाकडून गृह विभागाकडे हस्तांतरित होईल. म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र (नोऑब्जेक्शन सर्टिफिकेट) मिळाल्यानंतर इमारतीच्या बांधकामासाठी एजन्सी फिक्स करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली की, जुनी इमारत डिमॉलिश करुन नवीन प्लान प्रमाणे इमारतीचे नवीन स्ट्रक्चर तयार करण्यात येईल. त्या बाबतीत म्हाडा व मुंबई महानगरपालिकेशी बोलणे सुरु करण्यात आलेले आहे. ही रक्कम लवकरात लवकर भरण्यास जर शासनाने परवानगी दिली तर पुढची कामे करता येतील.

उपरोक्त प्रकरणी ४ वर्षांचा कालावधी होऊन गेला असून अजून नवीन इमारती घेण्यास किती वर्षे लागतील? शिवाय वसाहतीमधील सर्व रुम्स खाली करुन घेतल्यानंतर त्यांचे शिफ्टिंग कोठे केले जाणार आहे? त्या बाबत काही नियोजन केलेले आहे काय? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधीनी विदित केले की, परवानगी दिली तर हे काम तातडीने करुन घेतले जाईल. याबाबतचा प्लॅन तयार केलेला आहे. येथील ज्या इमारती खाली केल्या जाणार आहेत, तेथे राहणाऱ्या लोकांना उपलब्ध होणाऱ्या घरांमध्ये शिफ्ट केले जाईल.

समितीला पोलीस वसाहतीमध्ये राहणाऱ्या गृहिणींनी कडून सांगण्यात आले की, या पोलीस वसाहतींसमोर झोपडपट्टी असून त्या झोपडपट्टीतील लोक पाण्याच्या टाकीवर बसून दारु पितात. जर पोलिसांच्या वसाहती समोर अशा प्रकारे पोलिसांच्या डोळया समोर झोपडपट्टी असेल, तेथील लोक पोलिसांसमोरच दारु पित असतील आणि पोलिसांना हे सारे माहीत असूनही त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. एसीपी दर्जाचा वरिष्ठ अधिकारी तेथे नियंत्रण ठेवण्यासाठी असतांना पोलीस वसाहतीत राहणे कठीण आहे. या वसाहतींमध्ये पोलिसांच्या नावावर पोट भाडेकरु राहतात पोट भाडेकरु ठेवण्याचा अधिकार पोलिसांना आहे काय हे खरे असेल तर ही बाब फार गंभीर आहे.

ज्या कालावधीत दुरुस्ती करण्यात आली होती, त्याच वेळेस त्याठिकाणी गळती होत असल्याचे समितीला दिसून आले. जेथे निधी खर्च करुन इमारती बांधण्यात आल्या आहेत, परंतु त्याला हात न लावता, त्या व्यतिरिक्त तेथे नवीन इमारती बांधणार आहात काय? तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तेथे लिकेज होत नाही असे सांगण्यात येत असले तरी तेथे जाऊन पहाणी करावयास पाहिजे. तेथे काहीही खर्च न करता खोटी बिले काढण्यात आली आहेत. याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे? याबाबत काही चुकीचे झाले असेल तर चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. परंतू अद्यापपर्यंत तसे का करण्यात आले नाही? त्याचप्रमाणे ज्या इमारती दुरुस्त झालेल्या आहेत, तेथील मीटर काढलेली आहेत व ती परत बसविण्याचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे कोणत्याही क्षणी अपघात होण्यासारखी परिस्थिती आहे. जर गेल्या ४ महिन्यांमध्ये तेथे इलेक्ट्रीकचे काम केले नसेल किंवा तेथील साफसफाई केली नसेल तर सदरहू बाब गंभीर असून हा समितीचा अवमान करण्यासारखे आहे.

त्यावर विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, समितीने भेट दिल्यानंतर मीटर बसविण्याचे काम केलेले असून त्याचे फोटो देखील आणलेले आहेत.

या इमारतीमध्ये जे लोक डेंजर झोनमध्ये रहात आहेत, त्यांच्या जीवावर बेतू नये म्हणून पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, बी.पी.सी.एल.तर्फे १७०० क्वॉर्टर्स् उपलब्ध झालेल्या आहेत व ते नाहूरला आहेत. एमएमआरडीए मार्फत ७ हजार घरे बांधली असून त्यातील १७०० क्वॉटर्स पोलिसांसाठी आहेत. यामध्ये गृहनिर्माण विभागाच्या बाबतीत काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, त्याबाबत पूर्तता

झाल्यानंतर पोलिसांना तातडीने तेथे पाठविण्यात येईल. त्यामुळे तेथील पोलिसांना धोकादायक इमारतीमध्ये रहावे लागणार नाही याबाबत कालबध्द रितीने म्हाडाला पैसे द्यावयाचे आहेत आणि त्यानुसार हस्तांतरणाची प्रोसीजर पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेकडे परवानगीसाठी तातडीने प्रस्ताव पाठविला जाईल आणि इमारती पाडल्या जातील.

सध्या इमारतीच्या जागेभोवताली ज्या बेकायदेशीर झोपडपट्टया आहेत, त्या काढून टाकणार आहात काय? कारण पोलिसांच्या जागेवर अतिक्रमण करणे कायद्याने गुन्हा आहे अशी समितीने विचारणा केली असता. जर पोलिसांच्या जागेवर अतिक्रमण झाले असेल तर ते काढून टाकण्यात येईल. एसआरए च्या नियमाप्रमाणे कोणत्याही जमिनीवर अतिक्रमण असले तरी त्याला ही बाब लागू आहे. त्यांना तेथून हलवावयाचे असेल तर त्यासाठी २-३ मार्ग आहेत. एक म्हणजे हाऊसिंग स्टॉक असेल तर तो गृह विभगाकडे घेऊन तेथे बांधकाम करुन घेता येईल अशी परिस्थिती आहे. पोलिसांसाठी ज्या जागा ठेवण्यात आल्या आहेत, तेथे झोपडपट्टी निर्माण झालेली आहे आणि ती उठवावयाची असेल तर एसआरए मधून काम करता येईल. तसेच दुसरे म्हणजे जेव्हा सार्वजनिक गरजेसाठी जमीन रिक्त करावी लागते, त्यावेळी तेथील रहिवाशांसाठी एस.आर.ए.योजना लागू केली जाते.

पोलिसांसाठी घरे बांधत असताना तेथे शाळा व अंगणवाडी देखील असते. परंतु आता नवीन इमारती बांधत असताना त्या वेगळ्या स्वरुपात बांधण्यात येणार आहेत काय? कारण तळ मजल्यावर शाळा असते आणि वरच्या मजल्यावर लोक रहात असतात. त्यामुळे त्यांना त्रास होतो अशी समितीने विचारणा केली असता तेथे महानगरपालिकेच्या इमारतींचे बांधकाम सुरु होते. त्यामुळे पोलिसांच्या इमारतीं मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शाळा सुरु करण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले तसेच येथे शाळा ७-८ वर्षापासून आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता यांनी सांगितले. तसेच सदरहू शाळेबाबत विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, सदरहू जागा कोणत्या बेसवर घेतली होती? जर शाळा नव्याने बांधावयाची असेल किंवा त्याची दुरुस्ती करावयाची असेल तर पोलीस विभागाच्या जागेमध्ये शाळेसाठी वर्ग खोल्यांसाठी मागणी केली असेल. परंतु वर्ग खोल्या तयार झाल्यानंतर मात्र त्यांना तेथे पाठवावयास पाहिजे. यावर समितीने विचारणा केली की, जर महानगरपालिकेच्या शाळेसाठी पोलीस विभागाची जागा दिली असेल तर त्याबाबत लेखी स्वरुपामध्ये कागदपत्रे असावयास पाहिजेत. जर शाळा दुरुस्त करावयाची असेल किंवा नव्याने बांधावयाची असेल तर त्यासाठी ७-८ वर्षे लागण्याचे कारण नाही. त्यामुळे शाळेसाठी पोलीस विभागाची जागा कायम स्वरुपामध्ये देण्यात आली आहे की तात्पुरत्या स्वरुपात दिलेली आहे? त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सदरहू इमारतीमध्ये शाळा कशी आली आणि कधी आली याची माहिती घ्यावी लागेल.

पोलिसांसाठी जी जागा देण्यात आलेली आहे, त्याच्या ॲग्रीमेंटची प्रत आणि ते किती वर्षासाठी करण्यात आलेले आहे, तेथील इमारतींचे आयुर्मान किती आहे यासंबंधातील स्ट्रक्चरल रिपोर्ट, लाईट सिस्टीम, या इमारतींचे हस्तातरण तसेच तेथील अजुबाजूच्या मोकळ्या जागेच्या संबंधात काय करणार आहात, तेथील शाळेच्या बाबतीत काय परिस्थिती आहे, तेथील जागेचा नकाशा तसेच पोलिसांना एकंदर ज्या १४ इमारती देण्यात आलेल्या आहेत, त्याच्या अजुबाजूला किती जागा आहे? याबाबतची सर्व माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले.

दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुढील माहिती प्राप्त झाली.

माहिम पोलिस वसाहतीतील इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन-१९७९ साली हस्तांतरीत करण्यात आले. या इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर उपलब्ध अनुदान प्रमाणे, दुरुस्तीची कार्यवाही योग्य वेळी करण्यात आली आहे.

- सदर इमारतीच्या दुरुस्तीची कामे प्रगतीत असतांना या कामांची तपासणी, दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी करण्यात आली असून या तपासणीमध्ये या कामामध्ये कोणत्याही गंभीर उणीवा आढळलेल्या नाहीत. माहीम येथील नविन पोलीस वसाहती या इमारतीतील बैठकखोली, ंस्वयंपाकगृह, प्रसाधनगृह, स्नानगृह यासाठी सिपोरॅक्स स्लॅबचा वापर करण्यात आला असून एकबंध बांधकामाऐवजी सर्व ठिकाणी सांधे असून भिंती कॉंक्रीट ब्लॉकच्या आहेत. माहीम येथील इमारत क्र. २,३,९,१३,१५, व १६ अश्या एकूण ६ इमारतींची दुरुस्ती पोलीस इमारतींच्या दुरुस्ती कार्यक्रमातून माहे जून २००६ ते मार्च २००८ पर्यंत करण्यात आली असून स्थापत्य कामासाठी रु.४६३.०० लक्ष व विद्युत कामासाठी रु. २६.०० लक्ष असा एकूण रु. ४८९.०० लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. या दुरुस्तीच्या कामामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा अंतर्भाव आहे.

  १) स्वयंपाक घरातील ओटा बदलविणे व फरशा बदलविणे.

  २) प्रसाधनगृहाच्या डक्टच्या भिंतीचे बांधकाम व बाहेरील बाजूने गिलावा करणे.

  ३) इमारतीच्या जलवाहक नलिका व ड्रेनेज लाईनची नुतनीकरण करणे.

  ४) इमारतीच्या गच्चीला जलरोधक प्रक्रीया करणे.

  ५) स्वयंपाकघर, बैठकीची खोली व व्हरांडा यातील सिलींग प्लास्टर पडलेल्या ठिकाणी पॉलीमर सिमेंटचा गिलावा करणे.

  ६) प्रसाधनगृहाची जलरोधक प्रक्रिया करणे, दरवाजे बदलविणे व फरशी बदलविणे.

या दुरुस्तीच्या कामामध्ये प्रसानधगृहाची दुरुस्ती/नुतनीकरण व जलरोधक प्रक्रीया करणेच्या बाबींची व्याप्ती एकूण कामाच्या ४८९.०० लक्ष रक्कमेच्या साधरणपणे ४४.०० लक्ष म्हणजे साधारणपणे ९ टक्के एतकी आहे. दुरुस्ती केलेल्या ६ इमारतीमध्ये प्रसाधनगृहाचे जलरोधक प्रक्रीयेचे काम केले होते. या ५७६ प्रसाधनगृहापैकी ५०९ प्रसाधनगृहातील गळती पूर्णतः थांबली असून, फक्त ६७ प्रसाधनगृहातून किरकोळ स्वरुपात गळती असल्याचे निदर्शनास आले. संबंधित कंत्राटदाराला या प्रसाधनगृहातील गळती थांबविण्यासाठी कळविण्यात आल्यानंतर आजमितीस कंत्राटदाराने २४ प्रसाधनगृहातील गळती स्वखर्चाने थांबविली असून उर्वरीत ठिकाणी गळती थांबविण्याचे काम हाती घेण्यात येत आहे.

या इमारती कॉंक्रीट ब्लॉकच्या बांधण्यात आल्या असून, या कॉंक्रीट ब्लॉकच्या भिंती कालांतराने कमकुवत झाल्यामुळे पावसाळयात भिंतीमधून पाणी झिरपून खोलीच्या आतील भागात ओलावा जाणवतो.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या कामामध्ये सध्या प्रसाधनगृहाच्या डक्टच्या बांधकाम केलेल्या भिंतीला बाहेरुन गिलावा केलेला आहे.

उर्वरीत ८ इमारतीपैकी ७ इमारतींच्या (इमारत क्र.१,४,७,८,१४,१८,१९) दुरुस्तीसाठी गृह विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी ४६२.२१ लक्ष हया रक्कमेस पोलीस दुरुस्ती कार्यक्रम टप्पा क्र.३ मध्ये प्रशासकीय मान्यता सुध्दा प्राप्त झाली होती.

सदर इमारतीत मोठया प्रमाणात दुरुस्ती आवश्यक असल्याने, सदर इमारती खाजगी करणाद्वारे पुनर्बांधणी करणेचा प्रस्ताव विचाराधीन असल्यामुळे टप्पा क्र.३ मध्ये वरील ७ इमारतींची कामे हाती घेऊ नये असे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने वरील इमारतींची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.

समितीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्ती केलेल्या कामाची चौकशी करावयाचे निर्देश दिल्यानुसार मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी या कामाची तपासणी करण्यासाठी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. ५०५८ दिनांक २४/११/२०११ अन्वये एक समिती गठीत केली आहे. या चौकशी समितीने काम केलेल्या ठिकाणी पहाणी करुन चौकशीचा तपासणी अहवाल मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां) प्रादेशिक विभाग, मुंबई यांना सादर केला आहे.

सदर अहवालामध्ये तपासणी पथकाने त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे दिले आहेत.

१) काम सुरु असतांना दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने ४ इमारतींच्या कामाची पाहणी केली असून पाहणी अहवालानुसार कामांमध्ये कुठल्याही प्रकारच्या गंभीर उणीवा निदर्शनास आणलेल्या नाहीत.

२) चौकशी पथकाने सहा इमारतीमधील निवडक सदनिकांमध्ये काम निविदेतील तरतूदीनुसार झाले आहे अथवा नाही याबाबत तपासणी केली असता सर्वच ठिकाणी काम निविदेतील तरतूदीनुसार करण्यात आले असल्याचे आढळले आहे. सहा इमारतीमधील ५७६ सदनिकांपैकी फक्त ६७ सदनिकांमध्ये शौचालय व स्नानगृहांमध्ये गळती आढळली आहे. त्यापैकी २४ सदनिकांमध्ये दुरुस्तीचे काम कंत्राटदाराने पूर्ण केले असून उर्वरित सदनिकांमधील काम प्रगतीपथावर आहे. या ठिकाणी सिपोरेक्स स्लॅब पॅनलस बांधकामाच्या वेळी वापरल्यामुळे मोठया प्रमाणावर सांधे आहेत व कंपन किंवा आघात यामुळे जलाभेद्द प्रक्रीया कमकुवत होऊन काही ठिकाणी तीन वर्षाच्या कालावधी नंतर गळती/ओलावा आढळणे साहजिक आहे. ज्या सदनिकांमधील प्रसाधन गृहातून गळती आढळली आहे अशा ठिकाणी संबंधित कंत्राटदारांना नोटीस बजावून दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे असे निदर्शनास आले आहे.

३) शौचालये व स्नानगृह या ठिकाणी लॉफ्ट टँक/पाणी साठवण्याचे मोठे ड्रम्स ठेवण्यात आल्याचे आढळून आले आहे. सदर टाक्यांच्या वजनामुळे सिपोरेक्स स्लॅब पॅनलमध्ये उघडून गळती होण्याची शक्यत आहे, त्यामुळे सदर टाक्या व ड्रम्स काढून टाकणे आवश्यक आहे.

४) इमारतीच्या छतावरील स्लॅबला प्रोजेक्शन नसल्यामुळे पावसाळ्यात स्लॅबवरील पाणी भिंतीवरुन खाली उतरते व भिंती हॉलो सिपोरैक्त ब्लॉकच्या असल्यामुळे सदनिकांमधील आतल्या भागांना ओलावा येतो.

५) इमारतीच्या पूर्वरचित पध्दतीच्या बांधकामामुळे सांध्याचे प्रमाणे मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे गळती असणे साहजिक आहे. बांधकाम विभागाने तज्ञ सल्लागारांचा अहवाल घेऊन त्याप्रमाणे तरतुदी करुन इमारतीच्या सर्वकष दुरुस्ती चांगल्या प्रकारे करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे असे आढळते, परंतु स्लॅब पॅनल चे सांधे कंपन/आधात यामुळे कमकुवत होऊन काही ठिकाणी गळती आढळते अश्या ठिकाणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराकडून तात्काळ दुरुस्ती करुन घ्यावी.

६) निविदेतील तरतुदीप्रमाणे कार्यक्षेत्रावर काम करण्यात आल्याचे सर्वसाधारणपणे काही ठिकाणी गळती होत आहे व सदर गळती ही इमारतीच्या पूर्वरचित पध्दतीच्या बांधकामामुळे व स्लॅब पॅनलला मोठ्या प्रमाणावर सांधे असल्यामुळे होत असण्याची शक्यता आहे.

तपासणी पथकाच्या वरील निष्कर्षावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीची कामे केल्यामुळेच या इमारती पोलीसांच्या कुटुंबियांना राहण्यास योग्य होऊ शकलेल्या आहेत. या दुरुस्त केलेल्या इमारतीमध्ये साधारणपणे ९० टक्के रहिवाशी, सद्यस्थितीत वास्तव्य करीत आहेत.

माहिम पोलीस वसाहतीतील सदरहू शाळेत किरकोळ स्वरुपाच्या गळतीची काम होते, ती गळती थांबविण्यात आली आहे. ही शाळा सदर इमारतीत सन १९७९ पासून चालू आहे. पुर्नविकासानंतर शाळेचे भवितव्य बाबत गृहविभागाकडून खुलासा होणे अपेक्षित आहे.

सदर इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध होणाऱ्या निधीप्रमाणे दुरुस्तीचा प्राथम्य क्रम ठरवून इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येतात. पोलीस विभागाच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळा यांचेमार्फत करावी किंवा कसे याबाबत शासन पातळीवर निर्णय होणे आवश्यक आहे.

नविन पोलीस वसाहत माहिम येथील ओ.एन.जी.सी., सी.पी.डब्ल्यू.डी. या इमारतीच्या सद्य:स्थितीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

माहिम येथील नविन पोलीस वसाहतीतील १९ इमारतींचे बांधकाम म्हाडाने शिर्के ॲन्ड कंपनीमार्फत सन १९७८ साली बांधल्या होत्या. या इमारतीपैकी इमारत क्रमांक १, २, ३, ४, ७, ८, ९, १३, १४, १५, १६, १७, १८, १९ अशा एकूण १४ इमारती गृह विभागाकडे आहे. उर्वरित पाच इमारतीपैकी इमारत क्र. ६, १०, ११ या इमारती सी.बी.आय.कडे व इमारत क्र. १२ ओ.एन.जी.सी. व इमारत क्र. ५ खाजगी गृहनिर्माण संस्थेकडे आहे.

ओ.एन.जी.सी. व सी.बी.आय.च्या मालकीच्या इमारतीची पाहणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या :

१) या इमारतीच्या प्रसाधनगृहाच्या पूर्ण उंचीपर्यत टाईल्स लावलेल्या आहेत. तथापि, प्रसाधनगृहातून मोठ्या प्रमाणावर गळती असल्याचे निदर्शनास येते.

२) समाईक व्हरांड्याच्या स्लॅबमधील लोखंडी सळ्या गंजलेल्या अवस्थेत असून, गिलावा जागोजागी पडलेला आहे.

३) इमारतीच्या बाहेरील बाजूच्या गिलाव्याला जागोजागी भेगा पडलेल्या आहेत.

एकंदरीत या इमारतीतील परिस्थिती पोलिस इमारती सारखीच आहे. तथापि, या इमारती पोलिस इमारतीपेक्षा खालील कारणांमुळे वेगळ्या वाटतात :

१) या इमारतीचे बाह्य रंगकाम नुकतेच झालेले आहे.

२) या इमारतींना आवारभिंत बांधली असल्यामुळे, या इमारतींच्या आवारातून अनधिकृत व्यक्तींची ये-जा होत नाही.

३) या इमारतीतील रहिवाशी केर-कचरा खिडकीतून फेकत नसून, सर्व कचरा एकत्रित करुन बृहन्मुंबईच्या कचरापेटीत टाकतात, त्यामुळे परिसर स्वच्छ राहतो.

४) या इमारतीमध्ये दोन खोल्या एकत्र करुन उच्चश्रेणीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

माहिम पोलीस वसाहतीबाबत दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी गृह विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

माहिम येथील इमारती पोलीस विभागाने म्हाडाकडून घेतल्या आहेत त्या संबंधी म्हाडासोबत झालेल्या खरेदी संबंधीचा करारनामा प्रकरणी पोलीस विभागाचे म्हाडासोबत खरेदी विक्री करारपत्र झालेले आढळून आलेले नाही. तथापि, म्हाडाची कंत्राटदारासोबत झालेल्या बांधकाम करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली आहे. ती सोबत जोडली आहे.

खरेदीबाबतचा करारनामा झालेला नसल्यामुळे देखभाल व दुरुस्तीबाबतच्या जबाबदारीबाबत काहीही उल्लेख नाही. मे.बी.जी.शिर्के, कंपनी आणि म्हाडा यांच्यात झालेल्या बांधकाम करारपत्रानुसार इमारतीच्या आयुर्मानाबाबत कोठेही उल्लेख नाही, किंवा त्याबाबत कोणत्याही अटी व शर्तीमध्ये तरतूद नाही. सदर करारपत्रानुसार बांधकामाच्या विनिर्दिष्ट व गुणवत्ता /दर्जा याबाबत एक वर्षाची हमी होती दि. ७/१०/१९७८ रोजी ठेकेदाराने सदर गळतीबाबत १० वर्षाची हमी असल्याचे हमीपत्र दिले होते.

सदर इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन १९७९ मध्ये हस्तांतरीत करण्यात आले. त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार देखभाल व दुरुस्तीची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आली. सन २००६ ते २००८ दरम्यान सदर इमारतीच्या विशेष संरचनात्मक दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. त्यानुसार १४ पैकी एकूण ६ इमारतीच्या (५७६ गाळे) दुरुस्तीवर रु. ४८९.०० लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला. सदर ५७६ सदनिकापैकी ६७ सदनिकाच्या केवळ प्रसाधनगृहामध्ये किरकोळ स्वरुपात

गळती आढळून आली आहे. कंत्राटदाराला सदर गळती थांबविण्यासाठी कळविण्यात आल्यानंतर आजपर्यंत २४ प्रसाधनगृहातील गळती थांबविण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. सदर ठिकाणी जुन्या इमारती पाडून वाढीव क्षेत्रफळाच्या नवीन इमारती बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याने माहिम येथील उर्वरीत ८ इमारतींची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामाची चौकशी करण्याबाबत मुख्य अभियंता, मुंबई सा.बा.प्रादेशिक विभाग, यांनी एक चौकशी समिती गठीत केली होती. त्यांच्या अहवालानुसार निवेदेतील तरतूदीप्रमाणे काम झाल्याचे आढळून आलेले आहे. तपासणी पथकाच्या निष्कर्षावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी त्यांच्या अधिपत्याखालील मिळकत व्यवस्थापकांना निवासस्थानांची देखभाल करण्याबाबत वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. सदर इमारतीच्या पुनर्विकासाकरिता २.४८ चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन एकूण ९६० निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव म्हाडास सादर करण्यात येत आहे. याबाबत म्हाडा, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ कार्यालयांच्या प्रतिनिधीसोबत अ.मु.स.(गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झालेली असून प्राथमिक चर्चा झालेली आहे. पुन्हा लवकरच बैठक घेण्यात येऊन जमिनीचे मालकी हक्क, कन्वहेन्स इत्यादी अडचणी सोडविण्यात येतील व बांधकामाला लवकरच सुरुवात होईल. क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. निधी उपलब्धतेसाठी वित्त विभागाला प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बृहन्मुंबई शहर परिसरातील पोलीस वसाहतीची देखभाल व दुरुस्तीची कामे पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळाकडून करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत महामंडळाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

माहिम पोलीस वसाहतीमधील रिकाम्या जागेवरील अतिक्रमणाबाबत संबंधित पोलीस ठाण्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर वसाहतीस अप्पर मुख्य सचिव (गृह) यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत दि.५/१/२०१२ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केलेली आहे. याबाबत सर्व संबंधीत अधिकाऱ्यासोबत दि.७/१/२०१२ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे. बैठकीत प्राथमिक चर्चा झालेल्या असून याबाबत पुन्हा बैठक घेण्याचे नियोजित आहे. अतिक्रमणाबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर अतिक्रमण हटविणे त्यांचे पुनर्वसन इत्यादीबाबत एसआरए च्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर इमारतीमध्ये सन १९७९ पासून महानगरपालिकेची इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतची प्राथमिक शाळा सुरु झालेली आहे.

दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी अपूर्ण राहिलेल्या बैठकीच्या व विभागाकडून प्राप्त झालेल्या आश्वासित माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

समितीने माहीम (मुंबई) येथील पोलीस वसाहतीच्या दुरवस्थेबाबत पाहणी केली असता जी वाताहत या वसाहतीची झालेली आहे त्या अनुषंगाने समितीस समाधानकारक माहिती आपल्याकडून मिळालेली नाहीत. तसेच अपर मुख्य सचिव (गृह) यांनी माहीम पोलीस वसाहतीत जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार आपण पाहणी केली आहे काय, असल्यास आपल्याला काय आढळून आले आहे? अशी समितीने विचारणा केली असता गृह विभागाच्या विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे स्वत: त्यांनी माहीम पोलीस वसाहतीत जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तेव्हा त्यांच्यासोबत संबंधित मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व पोलीस अधिकारी सुध्दा होते. एकंदरित या इमारतींच्या स्ट्रक्चरची आम्ही पाहणी केली. तसेच या परिसरातील स्वच्छता पूर्वी कशी होती आणि आता कशी आहे तसेच पूर्वीची स्वच्छता आणि सध्याची स्वच्छता यात फरक काय आहे याचीही चाचणी केली. तसेच सदरहू इमारतींची सार्वजनिक बांधकाम विभागाचे विभागीय सचिव यांनी सुध्दा पाहणी केली. इमारतीच्या स्ट्रक्चरमध्ये दोष आणि देखभालीचा अभाव या दोन कारणांमुळे या इमारतींचे मेन स्ट्रक्चर मजबूत असून सुध्दा राहण्यास इच्छुक नाहीत, असे दिसते. या इमारतींचे बांधकाम ज्या विकासकाने केलेले आहे त्याच विकासकाने बांधलेल्या ओएनजीसीच्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती अधिक चांगली असल्यामुळे तेथे लोक राहत आहेत. ओएनजीसीच्या अखत्यारितील इमारतींमध्ये सुध्दा काही काही ठिकाणी गळती असल्याचे दिसून येते. गृह विभागाच्या अखत्यारित असलेल्या पोलीस वसाहतीच्या ज्या ६ विभागांमध्ये आपण ४.८९ कोटी रुपये खर्च करुन दुरुस्ती करुन घेतली त्यात ५५० गाळ्यांपैकी ६५ गाळ्यांमधील टॉयलेटमध्ये गळतीचे प्रमाण जास्त दिसत होते. उर्वरित गाळ्यांमध्ये हे प्रमाण कमी आहे. यासंदर्भात स्ट्रक्चरल स्पेशालिस्टशी चर्चा केली असता त्यातून असे निष्पन्न झाले की, पोलीस वसाहतीच्या इमारती आजच्या परिस्थितीत मोडकळीत आलेल्या असल्या तरी पाडण्यासारखी परिस्थिती मात्र नाही. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने विचार करता आम्हाला या संपूर्ण इमारती पाडून त्यासाठी असलेला २.४८ चा चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर करुन पुनर्बांधणी करावयाची झाल्यास त्याच जागेत ४०० चौ. फुटाचे ९५० गाळे बांधू शकतो. पण एवढ्या मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यासाठी या एकाच ठिकाणी ३०० कोटीच्या आसपास रक्कम लागेल. गृह विभागाकडून आजच्या परिस्थितीत संपूर्ण राज्यातील इमारतींसाठी ३०० कोटी रुपये दिलेले आहेत, त्यातून राज्यात अनेक ठिकाणच्या इमारतींचे काम करणार आहोत. त्यातून काही कामे चालू आहेत. या सर्व परिस्थितीचा विचार करता आम्ही फक्त ५० कोटी रुपये दरवर्षी देऊ शकतो. अशा प्रकारे सर्वच इमारती एकाच वेळेस पाडून बांधकाम करावयाचे तर त्यासाठी ६ वर्षांचा कालावधी लागू शकतो. या कालावधीत बजेट सुध्दा कमी जास्त होऊ शकते. तसेच दरवर्षी ठरल्याप्रमाणे निधी देऊ शकलो नाही तर बांधकामाची

किंमत वाढू शकते. म्हणून आमचा विचार असा आहे की, ज्या इमारतींमध्ये लोक राहत नाहीत अशा इमारती पाडून त्यांचे बांधकाम पूर्ण करावयाचे व लोकांना त्या इमारतीत स्थलांतरित करावयाचे. त्यानंतर दुसऱ्या दोन इमारती पाडून त्यांचे बांधकाम करावयाचे अशा प्रकारे काम करीत गेले तर कदाचित शक्य होईल.

याबाबत समितीने सूचित केले की, टाटा कंपनीने "नॅनो" कार बाजारात आणल्यानंतर त्यात काही दोष असल्याचे लक्षात आले होते. त्यानुसार कंपनीने बाजारातील सर्व गाड्या परत बोलावून त्यातील दोष पूर्ण दूर केले. अशा प्रकारे कंपनीने आपली चूक मान्य करुन त्यात दुरुस्ती केली. अशीच परिस्थिती येथे सुध्दा आहे. म्हाडाने ज्या कंपनीबरोबर करार केला त्या करारानुसार बांधकामात दोष असल्याचे सिध्द झाल्यानंतर बांधकाम करणाऱ्या कंपनीनेच हे दोष दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा म्हाडाने हे दोष दूर करुन दिले पाहिजे. यासंदर्भात गृह विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांबरोबर झालेल्या बैठकीत कोणता निर्णय घेतलेला आहे, तसेच या इमारती पाडण्या योग्य नाही. पण त्यात जे दोषी आहेत त्यांना पकडून त्यांच्यावर कोणती कारवाई आपण केली अथवा करणार आहात, तसेच यासंबंधीचा जो करारनामा करण्यात आलेला आहे त्यात काय म्हटले आहे ? अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, एखाद्या व्यक्तिने गुन्हा केला असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. मग त्यात "म्हाडा" सारखी संस्था असो अथवा बांधकाम करणारी "शिर्के" सारखी मोठी कंपनी असो. यामध्ये शासनाचे पैसे वाया गेलेले आहेत. आता आपण मात्र पुन्हा ३०० कोटी रुपये खर्च करुन या इमारतींचे बांधकाम करण्याचा विचार करीत आहात हे कितपत योग्य आहे? यासंबंधीची कागदपत्रे शोधण्याचा प्रयत्न केला असता पोलीस विभागाकडे या इमारतींचे हस्तांतरण होत असताना जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते आम्हाला मिळाले नाही. कंत्राटदाराशी म्हाडाचा जो करार झाला होता तो करार प्राप्त झालेला आहे. त्यात अशा प्रकारे कोणतीही हमी दिल्याचे दिसत नाही. त्यावर समितीने अशीही विचारणा केली की, कॉन्ट्रक्टरकडून जर स्ट्रक्चरलमध्ये दोष निर्माण झालेला असेल तर तो त्यांनीच दुरुस्त करुन दिले पाहिजे. या वसाहतीतील टॉयलेटचे स्लॅब एकमेकाला जोडलेले असल्याचे सुध्दा आढळून आले. हे स्लॅब अखंड असल्याशिवाय दुरुस्त होऊ शकणार नाही. म्हाडाने गृह विभागावर मेहेरबानी केली नाही तर त्यांना गृह विभागाने पैसे दिलेले आहेत. अशा परिस्थितीत दोषींवर काय कारवाई करणार आहात ?

याबाबत विभागीय सचिवांनी उपरोक्त बाब मान्य करुन या दोन स्लॅब मधून पाणी शिरुन मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे सांगितले तसेच समितीने अशीही विचारणा केली की, अशा प्रकारच्या स्ट्रक्चरला कोणत्या इंजिनियरने परवानगी दिलेली आहे, तसेच ज्यांनी अशी चुकीची परवानगी दिली असेल त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात. सिपोरेक्स ब्लॉकचे बांधकाम करण्याच्या संदर्भातील तंत्रज्ञान हे परदेशात सुध्दा आहे. पण त्यात प्रसाधनगृहाचा जो भाग आहे त्यासंदर्भात तर ज्या स्ट्रक्चरल इंजिनियरने अंतिम परवानगी दिली त्याने अशाप्रकारे चुकीचे काम करुन शासनाचे कोट्यवधी रुपये जाणार असतील तर या दोषी अधिकाऱ्यावर कारवाई झालीच पाहिजे. यामध्ये दुरुस्ती होऊ शकत नाही तर मग आपण सन

२००७ मध्ये ५ कोटी रुपये खर्च करण्याचे कारण काय होते ? उलट त्या रकमेत एखादी इमारत तरी बांधून पूर्ण करता आली असती. स्लॅब त्याच वेळेस काढून टाकायला पाहिजे होता. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, स्ट्रक्चर पाडण्यासारखे नाही, त्यामुळे जो गळतीचा त्रास होत आहे तो दुरुस्ती केल्याने दूर होऊ शकतो. गृह विभागाने ४.८९ कोटी रुपये खर्च करुन जवळपास ५५० गाळ्यांची दुरुस्ती केली, त्यापैकी ६५ गाळ्यांमध्ये मायनर गळती अजूनही आहे.

सन २००७ मध्ये गृह विभागाने कळविलेले आहे की, वसाहतीतील इमारतींची अवस्था अत्यंत वाईट आहे, या इमारतीची दुरूस्ती न करता या इमारतींची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. स्ट्रक्चरल इंजिनियरकडून तपासणी केली असता स्ट्रक्चरमध्ये किंचीत दोष असल्याचे आढळून आले असले तरी इमारती पाडण्याची आवश्यकता नाही. तसेच यावेळेस १३ कोटी रुपये सुध्दा मंजूर झाले होते. मग आता पाच वर्षात या इमारतींची परिस्थिती का सुधारली नाही ? त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, पोलीस वसाहतीत इमारतीच्या बाहेर मोकळ्यावर घाण व कचरा टाकला जात असल्याने तळमजल्यावरील रुममध्ये राहणे शक्य नाही, अशी परिस्थिती आहे. या परिसराची संपूर्ण स्वच्छता गेल्या दोन महिन्यात करुन घेतली आहे. आजच्या परिस्थितीत यामध्ये सुधारणा झालेली आहे. तसेच ६ गाळ्यांची दुरुस्ती केलेली आहे. दुरुस्तीच्या निविदांमध्ये जो स्कोप ठेवलेला होता त्यानुसार पुर्तता झाली की नाही यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. त्या समितीने तेथे जाऊन चौकशी करुन ॲग्रीमेंटनुसार काम झालेले आहे की नाही याची पाहणी केली. तसेच ६७ प्रसाधानगृहामध्ये जॉईंटली स्लॅब असल्याने किरकोळ गळती आहे. कंत्राटदाराने रिपेअरच्या कामाची ७ वर्षांची गॅरंटी दिली आहे. आज या दुरुस्तीला ४ वर्षे झाली असून गॅरंटीच्या कालावधीतच या एजन्सीकडून दुरुस्तीचे काम पूर्ण करुन घेण्यात येईल. आजपर्यंत २४ ठिकाणची दुरुस्ती केलेली असून उर्वरित गाळ्यांची दुरुस्ती लवकरच करण्यात येईल.

सन २००७ मध्ये पोलीस विभागाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना जे पत्र पाठविले आहे ते चुकीचे आहे का? पोलीस वसाहत माहीम येथील इमारती पाडून टाकण्यासारखी परिस्थिती नाही. सन २००७ मध्ये या इमारती पाडून टाका असा अहवाल दिला गेलेला आहे. आता असे सांगण्यात येते की, या इमारती पाडून टाकण्याची आवश्यकता नाही. पूर्वीच्या अहवालामध्ये आणि आताच्या परिस्थितीमध्ये पूर्णपणे विसंगती दिसून येते.

अधीक्षक अभियंता, मुंबई, (सा.बां.) मंडळ यांना तत्कालीन सह पोलीस आयुक्त यांनी लिहिलेल्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, पोलीस विभागाच्या दुरुस्ती कार्यक्रमातंर्गत तिसऱ्या टप्प्यात मंजूर झालेल्या इमारतींपैकी नवीन पोलीस वसाहत माहीम येथील टप्पा क्रमांक ३ मधील इमारत क्रमांक १, ४, ७, ८, १४, १८ आणि १९ या इमारतींच्या दुरुस्तींची कामे गृह विभागाने रद्द केलेली आहेत. सदर इमारती जास्त प्रमाणात मोडकळीस आल्यामुळे व त्या ठिकाणी खाजगीकरणांतर्गत नवीन इमारती बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम करु नये. तसेच सदर इमारतीसाठी

मजूंर करण्यात आलेला एकूण निधी रु ४.६३ कोटी या रकमेचा वेगळा प्रस्ताव पोलीस विभागाच्या दुरुस्तीच्या कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या इतर इमारतीमध्ये अतिरिक्त कामासाठी वापरण्यात यावा व त्याचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, आज आपण सांगत आहात की, त्या इमारती चांगल्या आहेत, परंतु त्यावेळच्या अधिकाऱ्यांना त्या पाडून टाकण्यासारखी परिस्थिती दिसत होती.

ब्रिटीश सरकारने १२० वर्षापूर्वी आपल्या राज्यात पूल, इमारती बांधलेल्या असून त्यांची १०० वर्षाची हमी दिलेली होती. आता काही इमारती आणि पूलांच्या बाबतीत त्यांचे पत्र आलेले आहे की, या इमारती, पूल जुने झालेले आहेत. अशाच प्रकारे म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी देखील पोलीस वसाहतीच्या इमारतीसंदर्भात हमी घेणे आवश्यक होते. या इमारती केव्हा बांधण्यात आल्या? तसेच या इमारतीचे आयुर्माण किती असावे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, सन १९७८ साली इमारतीचे बांधकाम केले असून त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्या हस्तांतरित केल्या आहेत. इमारतीचे आयुर्माण साधारणपणे ६० वर्ष असणे आवश्यक आहे. इमारती ३० वर्षात मोडकळीस आल्या असतील तर त्यात स्ट्रक्चरल फॉल्ट आहे, हे निश्चित आहे. सदरहू स्ट्रक्चरल फॉल्ट दुरुस्त करुन देणे ही दोघांचाही जबाबदारी आहे. ग्राहक हक्क संरक्षण कायद्यानुसार एखाद्या विकासकाने चुकीच्या पध्दतीने इमारतींचे बांधकाम केले असेल तर ओनर ॲक्टप्रमाणे संबंधित विकासकाने किंवा मूळ मालकाने ती दुरुस्ती करुन दिली पाहिजे. या इमारतींमध्ये दोष कोणाचा आहे, त्यानुसार संबंधिताने ते बांधकाम करुन देणे आवश्यक आहे. या इमारती म्हाडाने बांधल्या असतील तर त्यांनीच त्या दुरुस्त करुन देण्याची आवश्यकता होती. म्हाडाने या इमारती बांधल्या असून त्यांच्याकडून पोलीस विभागाने विकत घेतल्या आहेत. शासनाने बांधकाम केले असते तर शासनाने शासनाची टेक्नॉलॉजी वापरली असती. पोलीस विभागाने म्हाडाकडून इमारती विकत घेतल्या आहेत त्यामुळे मूळ मालक म्हाडा आहे. म्हाडाने या इमारती बांधण्यासाठी जो विकासक नेमला असेल त्याच्याकडून या इमारतींची दुरुस्ती करुन घेणे आवश्यक होते. यासंदर्भात पोलीस विभागाची काय भूमिका आहे? कायद्याप्रमाणे आपण गि-हाईक आहात. आपण म्हाडाकडून इमारत विकत घेतली आहे त्यामुळे त्यांच्याविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, शासनाने स्ट्रक्चरला मान्यता दिली होती. म्हाडा आणि पोलीस खात्यामध्ये करार झाला असेल आणि त्यात अटी व शर्ती असतील तर त्यांच्याकडून इमारतीची दुरुस्ती करुन घेता येईल. तशा प्रकारचे कराराचे पत्र गृह विभागास अजून उपलब्ध झालेले नाही. पोलीस विभागाचे असे म्हणणे आहे की, करार झालेला नाही, परंतु तसे वाटत नाही त्याबाबत समितीने नाराजी व्यक्त करुन सूचित केले की, आपण या राज्यातील गृह खात्याचे प्रमुख आहात. इमारती बांधकामाबाबतचा करार झाला नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. ओनर ॲक्टप्रमाणे करारनामा झाल्याशिवाय एक रुपया देखील

खर्च करता येत नाही. त्यावर विभागीय सचिवांनी सहमती दर्शवून जमीन महसूल खात्याची असून त्यानंतर ती म्हाडाकडे येईल.

म्हाडा उच्च उत्पन्न, अल्प उत्पन्न, तसेच मध्यम उत्पन्न गटासाठी घरे बांधून विकते. परंतु अशा घरांची विक्री करत असतांना त्यात दोष आढळला तर ती दुरुस्त करण्याची जबाबदारी कोणाची आहे? स्क्ट्रक्चरमध्ये दोष असेल, स्लॅप १०० टक्के चुकीचा टाकला गेला असेल तर ही जबाबदारी म्हाडाची नाही का? असे समितीने सूचित केले असता समितीला याबाबत म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून समाधनकारक उत्तर मिळाले नाही. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ही जमीन हस्तांतरित केलेली आहे.

सन १९७९ सालात सदरहू इमारती बांधून घेण्यात आल्या आहेत. त्यावेळी त्यात काही त्रुटी व चुका झाल्या होत्या त्यानंतर सदरहू जमीन महसूल विभागाकडून म्हाडाकडे हस्तांतरित करण्यात आली. एकीकडे ओएनजीसी आणि सीबीआय यांच्या इमारतींच्या मेन्टनन्स सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे त्यामुळे त्या इमारती चांगल्या स्थितीत आहेत. दुसरीकडे मात्र पोलीस वसाहतीच्या इमारतींचे मेन्टन्स पोलीस विभागाने व्यवस्थितरित्या राखलेले दिसत नाहीत. ही जबाबदारी गृह विभागाची देखील होती. ६७ ठिकाणी इमारतींची गळती होत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले परंतु २०० ठिकाणी गळती होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात स्थानिक लोकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. तेथील लोकांच्या ज्या तक्रारी आहेत त्या दुर न करता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खिडक्यांचे दरवाजे, खिडक्या बदलण्याचे काम करण्यात येत आहे. लोकांना जे हवे आहे ते मात्र केले जात नाही. बजेटमध्ये या सर्व गोंष्टींच्या दुरुस्तीसाठी तरतूद करणे आवश्यक आहे. म्हाडा शिर्के विकासकाला दोषी का धरत नाही. तेथील इमारतींची पुनर्बांधणी करावयाचे ठरविले तर त्याबाबतचे कागदपत्रे तुमच्याकडे उपलब्ध नाहीत. तेथील जागेची मोजणी करुन त्यासाठी किती पैसे लागतील त्याबाबतचा अंदाज विभागास घ्यावा लागेल. आपण भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी आहात त्यामुळे अशा पध्दतीने आपण उत्तर देणे संयुक्तिक नाही. सन १९७८ साली जागेचा ताबा दिला आहे, परंतु संबंधित विकासकाविरुध्द अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. शासनाचे हे अधिकारी चुका करतात त्यामुळे त्यांच्याविरुध्दही शिक्षा होणे आवश्यक आहे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्याबाबत सहमती दर्शविली त्यावर समितीने निदर्शनास आणलेली शिर्के कंत्राटदार यांच्यापैकी एकावर दोष निश्चित केले पाहिजेत अशी सूचना केली. गेल्या ३४-३५ वर्षानंतर शासनाने जमीन हस्तांतरित केलेली आहे. या इमारतींच्या अनुषंगाने शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतींची पुनर्बांधणी करुन घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी करुन माहिम पोलीस वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम टप्याटप्याने सुरु केले जाणार आहे. सदरहू पोलीस वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम कोणत्याही परिस्थितीत मे.बी.जी. शिर्के, कंत्राटदार यांना दिले जाणार नाही असे आश्वासन देण्यात आले.

तसेच यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या कामामध्ये कसूर केलेली आहे, अशा अधिकाऱ्यांना निश्चितपणे जाब विचारला जाईल.

या विषयाच्या संदर्भात म्हाडा, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्ट्रक्चरल इंजिनिअर आणि मे.बी.जी.शिर्के, कंत्राटदार यांच्यापैकी ज्यांनी चुकीच्या पध्दतीने काम केलेले आहे, अशा अधिकाऱ्यांच्या विरुध्द किती दिवसाच्या आत कारवाई करणार वा करण्यात येणार आहे. अशी समितीने विचारणा केली असता. विभागीय सचिवांना विहित केले की, या विषयाच्या संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली जाणार आहे. अद्यापही विभागाला कंत्राटदाराबरोबर केलेल्या कराराची प्रत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे करारामधील कोणत्या कलमाचा भंग झालेला आहे, तो तपासल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास सोपे जाणार आहे. तथापि, समितीला ॲग्रिमेंटच्या कॉपीची प्रत प्राप्त झालेली आहे. यामधील निविदा व कंत्राटबद्दल अपूर्ण माहिती दिलेली आहे. बांधकाम डिझाईनची माहिती सुध्दा अपुरी दिलेली आहे. तसेच शेड्युल "अ" आणि "ब" हे पूर्णपणे निरंक दाखविलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या विषयाच्या संदर्भात सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पत्र लिहून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

स्ट्रक्चरल इंजिनिअरने सन २००७ मध्ये तेथील इमारतींची अवस्था अतिशय वाईट असल्यामुळे पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे अशा आशयाचे पत्र संबंधित अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले होते. परंतु आता हे स्ट्रक्चर चांगले आहे, म्हणून इमारती तोडण्याची आवश्यकता नाही असे त्यांच्याकडून कळविण्यात आले आहे. तरी त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन माहिम पोलीस वसाहतीतील इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम टप्प्याने सुरु केले पाहिजे. यासंदर्भात विभागाने एक समन्वय समिती नियुक्त करण्याची गरज आहे. माहिम पोलीस वसाहतीमधील स्थानिक रहिवाशांना फायदा होईल अशा प्रकारची कार्यवाही विभागाने केली पाहिजे त्यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की यासंदर्भात माझ्या स्तरावर समन्वय ठेवून पुढील योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे तसेच भविष्यात आणखी दोन ते तीन बैठका संबंधित अधिकाऱ्यांसमवेत घेण्यात येणार आहेत.

त्या इमारतींची आवश्यक दुरुस्ती करण्याचे काम विभागाने हाती घेतलेले आहे. माहिम पोलीस वसाहतीमधील स्थानिक लोकांना रहाण्यायोग्य घरे बांधून देण्यासाठी विभागाकडून निश्चितच योग्य ते प्रयत्न केले जाणार आहेत. शिवाय विभागाने स्थानिक महिलांची एक समिती स्थापन केली आहे. घरा-घरातून कचरा उचलण्यासाठी दोन माणसांची नियुक्ती केलेली आहे. ओला व सुका कचऱ्याचे व्यवस्थापन करुन गांडुळ खत निर्मिती केंद्र सुरु करण्याची विभागाची कल्पना आहे. याबाबत माहिम पोलीस वसाहतीमधील साफसफाई करण्यासाठी संबंधितांबरोबर बैठक आयोजित करुन पुढील कार्यवाही करणार आहोत.

माहिम पोलीस वसाहतीमधील एका इमारतीमध्ये शाळा सुरु आहे. ही शाळा महानगरपालिकेची आहे की दुसऱ्या कोणाच्या मालकीची आहे, यासंदर्भातील माहिती समितीला देण्याबाबत सांगितले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून सदर शाळा सुरु करुन घेण्यात आली होती. परंतु, आता सदर शाळेमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुले शिक्षण न घेता आजूबाजूच्या झोपडपट्टयातील मुले सदर शाळेत शिक्षण घेत आहेत. सदर शाळा गृह विभागाच्या अख्यत्यारित आहे. सद्य:स्थितीमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची जास्त मुले शिक्षण घेत नाहीत. त्यामुळे शाळा चालू ठेवावी किंवा कसे याबाबतचा निर्णय गृह विभाग लवकरच घेणार आहे. त्यावर समितीने अशीही विचारणा केली की, सदर शाळेचे स्थलांतर केले तरी, त्या ठिकाणी पावसाळ्यात दीड ते दोन फुट पाणी साचते, ही वस्तुस्थिती आहे. परिणामी भविष्यात त्या ठिकाणी रहायला जाणाऱ्या रहिवाशांना त्याचा त्रास होणार आहे त्याबाबत विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, सद्य:स्थितीमध्ये शाळा आहे त्याच ठिकाणी ठेवायची म्हटले तर महानगरपालिकेला त्याचे बांधकाम करुन द्यावे लागणार आहे.

माहिम येथील इमारतींच्या संदर्भात पोलीस विभागाने म्हाडासमवेत खरेदी विक्री करारनामा केलेला नाही. यामध्ये मे.बी.जी. शिर्के कंपनीने काम केलेले आहे. सदर कंपनीने १९७८ साली इमारतींचा ताबा दिला. त्यानंतर कामाच्या संदर्भात कंपनीची दोन वर्षापर्यंत जबाबदारी होती. १९८० साली कंपनीला रिफंडची रक्कम देणे आवश्यक असताना, १९७९ मध्येच कंपनीला सर्व रिफंडची रक्कम अदा करण्यात आली. या प्रकरणी सखोल चौकशी करुन जे कोणी दोषी असतील, त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करावी अशी समितीची सूचना आहे. या संदर्भात समितीला अतिशय गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. या प्रकरणी संबंधितांविरुध्द कारवाई न केल्यामुळे समिती नाराजी व्यक्त करीत आहे. चांगली कामे व्हावीत असा समितीचा मूळ उद्देश आहे. २५ ते ३० वर्षांच्या कालावधीतच नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये गळती होत असल्यामुळे, त्या इमारती पाडून पुन्हा नव्याने बांधणे, ही बाब योग्य नाही. या प्रकरणी गृह विभागाच्या विभागीय सचिवांनी लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी.

अभिप्राय व शिफारशी

१) पोलीसांना निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने माहिम, मुंबई येथे म्हाडाकडून सन १९८० मध्ये इमारती विकत घेतल्या आहेत. म्हाडाने सदर १९ इमारतींचे बांधकाम १९७८ मध्ये मे.शिर्के बिल्डर यांचेकडून करून घेतले असून, सदर इमारतींपैकी १४ इमारती (इमारत क्र.१ ते ४,७ ते ९,१३ ते १९) गृह विभागाने म्हाडाकडून रु.४ कोटी २७ लाख एवढ्या किंमतीला विकत घेतल्या आहेत. इमारतीच्या बांधकामास आतापर्यंत ३४ वर्षांचा कालावधी झालेला आहे. सन २००६-२००७ पासून आजमितीस या इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.५,०४,६७,८४०/- एवढा निधी मंजूर केला असून, त्यापैकी रु.३,४६,४२,३९५/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यानंतर त्या इमारतीचे आयुर्मान ६० वर्षे धरण्यात येते. या इमारतीचे बांधकाम इतके निकृष्ठ करण्यात आले आहे की, त्या इमारतींना ३० वर्षापर्यंतच सुमारे साडेतीन कोटी इतकी रक्कम दुरुस्तीवर खर्च करावी लागली आहे व काही इमारती दुरुस्ती करण्यापलीकडे गेल्या म्हणून त्या पाडून नवीन बांधण्याचा अधिकाऱ्यांनी विचार केला आहे. समितीने सदर इमारतींची प्रत्यक्ष पहाणी केली त्यावेळी इमारतीची अत्यंत दुरावस्था झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय अधिकाऱ्यांनी या इमारतींची साफसफाई व्यवस्थित होत नसल्याने इतकी दुरावस्था झाल्याने निदर्शनास आणले असले तरी, इमारतींचे बांधकामच मुळात अत्यंत निकृष्ठ झाल्याची साधार शंका उपस्थित होते वास्तविक सदर इमारतीचे बांधकाम होत असतानाच सुरुवातीपासून म्हाडाने त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते तसेच गृह विभागाने सुध्दा प्रस्तुत इमारतींच्या बांधकामाच्या दर्जाची तपासणी न करताच इमारती विकत घेतल्या आहेत तसेच वर म्हटल्याप्रमाणे सदर इमातींच्या दुरुस्तीवर आजमितीस पर्यंत जवळपास साडेतीन कोटी रुपये खर्च करून ही सदर इमारतीची अत्यंत दुरावस्था असून त्या राहण्या योग्य नाहीत. ही परिस्थिती लक्षात घेता गृह विभागाने ज्या १४ इमारती विकत घेतलेल्या आहेत त्या विकत घेतांना इमारतींच्या बांधकामाची पुर्णतः तपासणी करून इमारतीच्या बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता व त्याकरिता वापरलेले साहीत्य आणि इमारतीचे आयुर्मान लक्षात घेवून सदरहू इमारती खरेदी करण्यास योग्य आहेत किंवा कसे ही बाब प्राधान्याने तपासणे आवश्यक होते तथापि, या प्रकरणी विभागाने दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट पणे दिसून येते **यास्तव भविष्यात शासनाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी इमारती खरेदी करतांना त्या इमारतींचा दर्जा, गुणनियंत्रण विभागाकडून तपासून घेवूनच खरेदी करण्यात याव्यात व त्यासंबंधिची "मार्गदर्शकतत्वे" तातडीने निश्चित करण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.**

२) माहीम येथील नवीन पोलीस वसाहतींच्या प्रस्तुत १४ इमारतींचे बांधकाम अत्यंत निकृष्ठ झाल्याने इमारतीच्या बांधकामानंतर केवळ २० ते २५ वर्षातच त्यांची दुरावस्था झालेली आहे व आजमितीस प्रस्तुत इमारतीच्या दुरुस्तीवर सन २००६-२००७ पासून रु.साडेतीन कोटी इतकी मोठी रक्कम खर्च करूनही अद्यापही दुरुस्तीची कामे अपूर्णच असून इमारती रहाण्यायोग्य नाहीत ही बाब अत्यंत गंभीर आहे. समितीच्या पाहणीत सदर इमारतींची योग्यरित्या दुरुस्ती न करताच दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या रक्कमांची देयके काढून निधीचा दुरुपयोग केला असल्याचे समितीचे प्रथम दर्शणी (Primafacie) मत झाले आहे. सबब **समिती अशी शिफारस करीत आहे की, इमारतींच्या दुरुस्ती देखभालीवर झालेल्या कामांची व त्यावर खर्ची पडलेल्या रक्कमेची सखोल चौकशी करून त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा.**

३) गृह विभागाने म्हाडाकडून माहिम येथील १९ इमारतीपैकी पोलीसांच्या निवासस्थानासाठी १४ इमारती विकत घेतल्या व उर्वरित ५ इमारती म्हाडाकडून ओएनजीसी व इतरांनी विकत घेतल्या सर्व इमारती मे.शिर्के यांनीच बांधल्या आहेत. सदर इमारतींची तपासणी करतांना असे निदर्शनास आले की, ओएनजीसी व इतरांच्या ५ इमारती अत्यंत चांगल्या अवस्थेत आहेत. मात्र पोलीसांच्या वसाहतीची अवस्था अत्यंत वाईट आहे. काही इमारतीची इतकी पडझड झाली आहे की, तेथे रहाणे अशक्य आहे. दुरुस्ती करणेही शक्य नाही. सदर इमारतींच्या दुरावस्थेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना समितीने विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, पोलीस वसाहतीमधील नागरीक साफसफाई ठेवत नाहीत. कचरा उघड्यावर टाकतात, साफसफाई करण्यासाठी एकही सफाई कामगार नाही किंवा सफाईंची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे वसाहतीत घाण साचते, वाया गेलेले अन्न व कचरा इमारतीच्या मधल्या भागात खिडकीतून टाकला जातो. त्यामुळे परिसर अस्वच्छ दिसतो व स्वच्छता राखली जात नाही. गृह विभागाने सदर परिसराची स्वच्छता राखण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केलेला आहे परंतू त्यांच्याकडून योग्य उपाययोजना केल्या जात नाहीत किंवा त्यांच्याकडून दिलेल्या सूचनांचे पालन रहिवाशांकडून केले जात नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देतांना सांगितले की, तेथील साफसफाईच्या कामावर देखरेख करण्यासाठी (एसीपी) सहायक पोलस आयुक्त दर्जाचा अधिकारी नियुक्त केलेला असून सुध्दा रहिवाशी त्यांचे ऐकत नसतील तर अशा रहिवाशांवर कारवाई करणे आवश्यक आहे तसेच अधिकाऱ्यांकडून जर काम होत नसेल तर त्यांच्यावर देखील कारवाई होणे आवश्यक आहे. एकाचवेळी बांधलेल्या इमारतीपैंकी ओ.एन.जी.सी.च्या ५ इमारती दुरुस्ती देखभाल व स्वच्छ या कारणामुळे चांगल्या स्थितीत आहेत मात्र पोलीसांच्या इमारती साफसफाई व दुरुस्ती देखभाल अमावी रहाण्यास योग्य नाहीत. ही अत्यंत गंभीर बाब आहे, **सदर वसाहतीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी नेमलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्तांनी आपल्या कर्तव्यपरायणतेत कसूर केल्याचे स्पष्ट दिसून येते. सबब उक्त अधिकाऱ्यानी आपली जबाबदारी पार न पाडल्याने या प्रकरणी चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच स्वच्छतेसंदर्भात अधिकाऱ्याने केलेल्या सूचना रहीवाशांनी पाळणे बंधनकारक असून जे रहीवाशी या सूचनांचे पालन करणार नाहीत त्या रहीवाशांवर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करण्यात यावी तसेच १४ इमारती मधील रहीवाशांच्या दुरुस्ती संदर्भातील तक्रारी नोंद करण्यासाठी तक्रार नोंद वही व सदर तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक लागणारा सफाई व इतर कर्मचारी वर्ग तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

४) विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीस असे निदर्शनास आले की, राज्यातील पोलीस वसाहतींच्या देखभाल दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर देखभाल दुरुस्तीचे काम विहित वेळेत व यथायोग्य झाले नाही तर संबंधितांविरुध्द गृह विभागाला प्रत्यक्ष कारवाई करण्याचे अधिकार नाहीत या कामी त्यांना पुर्णतः सार्वजनिक बांधकाम विभागावरच अवलंबून रहावे लागते. त्यामुळे देखभाल दुरुस्तीच्या कामावर सक्षमपणे नियंत्रण रहात नाही. **सबब पोलीस वसाहतींच्या इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीची कामे पोलीस गृहनिर्माण मंडळाकडेच सोपविण्यात यावी जेणेकरुन गृह विभागाचे त्यावर प्रत्यक्ष नियंत्रण राहील अशी समितीची शिफारस आहे.**

५) माहिम पोलीस वसाहतीची पहाणी केल्यानंतर साक्षीच्यावेळी गृह विभागाने म्हाडाकडून व म्हाडाने मे.शिर्के यांच्याकडून ज्या इमारती विकत घेतल्या त्याचे करारनामे सापडत नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले. **करारनाम्यात काय अटी व शर्ती आहेत याची तपासणी विभागाने केलेली नाही. इमारतीचे आयुष्य किती, इमारतीची देखभाल दुरुस्ती कोण व किती कालावधीपर्यंत करणार याची माहिती ज्या दस्ताऐवजात होती तेच शासकीय दस्तऐवज विभागास मिळत नाहीत ही बाब अतिशय गंभीर असून विभागाच्या हलगर्जीपणाबद्दल समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

सदरहू शासकीय दस्तऐवज हे अतिशय महत्वाचे असताना देखील संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची व्यवस्थितरित्या जपणूक केली नसल्यामुळे या प्रकरणी चौकशी करून जे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

पोलीस वसाहतीमधील एकूण १४ इमारतीपैंकी ७ इमारती (इमारत क्र.१,४,७,८, १४, १८ व १९) अत्यंत नादूरुस्त असून रहाण्यास योग्य नसल्यामुळे खाजगीकरणाद्वारे पुर्नबांधणी करण्याचा प्रस्ताव असल्याने या इमारतींच्या दुरुस्तीची कामे घेवू नयेत असे निर्देश दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ रोजी सह पोलीस आयुक्त यांचे मार्फत देण्यात आलेले होते म्हणून सदर इमारतींच्या दुरुस्तीची कामे थांबविण्यात आली मात्र विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी या इमारतीचे स्ट्रक्चर तपासणी अती चांगले असल्याने पुर्नबांधनी करणे आवश्यक नसल्याचे समितीच्या निदर्शनास आणले **उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता उपरोल्लेखित ७ इमारतींची पुर्नबांधणी करण्याची आवश्यकता नसल्याने इमारतींची दुरुस्ती सहा महिन्यांच्या आत करून कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी त्या उपलब्ध करून देयात याव्यात अशी समितीची शिफारस आहे. या इमारतीची दुरुस्ती सहा महिन्याच्या आत करून कर्मचाऱ्यांना रहाण्यासाठी उपलब्ध करून त्या इमारती मधील निवासस्थानी देण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.**

६) माहीम पोलीस वसाहतीच्या १० इमारती गृह विभागाने विकत घेतल्या असल्या तरी गृह विभाग आणि म्हाडा यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्याची प्रत विभागाचे अधिकारी समितीला देऊ शकले नाहीत. इमारती विकत घेतल्या मात्र जागा अद्याप विभागाच्या मालकीची नाही. जागेची चतू:सीमा निश्चित करण्यात आलेली नाही तसेच वसाहतीकरीता देखील संरक्षक भिंत बांधण्यात आलेली नाही संरक्षण भिंत नसल्याकारणाने वसाहती शेजारील झोपडपट्टीवासीय वसाहतीतून ये जा करतात तसेच वसाहतीतील मोकळ्या जागेचा मद्यपान व शौचालयाकरीता वापर केला जातो. त्यामुळे या गोष्टीला प्रतिबंध करण्यासाठी वसाहतीच्या संपूर्ण क्षेत्रात तात्काळ **संरक्षक भिंत बांधण्यात यावी अशी समितीची आग्रही शिफारस आहे. समिती अशीही शिफारस करीत आहे की, सदरहू जागा गृह विभागाच्या नावावर नसल्यामुळे ती जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टा करारावर घेयासाठीचा प्रस्ताव महासंचालक, पोलीस गृहनिर्माण मंडळ यांचेकडे सादर करण्यात आलेला असून तो प्रलंबित आहे उक्त प्रस्तावावर विनाविलंब निर्णय घेवून सदरहू जमीन तात्काळ गृह विभागाच्या नावे करण्यात यावी.**

****

परिशिष्ट

(प्रपत्र - १ ते ३)

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक
दिनांक १४ सप्टेंबर, २०११
स्थळ : मुंबई माहिम पोलिस वसाहत
उ प स्थि ती

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. अशोक जाधव, वि.स.स.

३) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

४) श्री. प्रकाश शेंडगे, वि.स.स.

५) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स.

६) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)

मंत्रालयीन अधिकारी

१) श्री. नं.म. शिंदे, उप सचिव, गृह विभाग

२) श्री. दि. शा. घाटगे, कक्ष अधिकारी, गृह विभाग

पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई

श्री. महेश धुरवे, पोलीस उप आयुक्त

सार्वजनिक बांधकाम विभाग

१) श्री. ल. ह. बिळगोजी, उप विभागीय अभियंता

२) श्री. उ. प्र. देबडवार, अधीक्षक अभियंता

४) श्री. एन.एन.पवार, कार्यकारी अभियंता

५) श्री. म.वि.शेवाळे, उप अभियंता, (विद्युत)

६) श्री. न.वि.नारखेडे, सहायक अभियंता

समितीने मुंबईतील माहिम पोलिस वसाहत येथे भेट देऊन पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

दुसरी बैठक
दिनांक २३ नोव्हेंबर, २०११
स्थळ : मुंबई माहिम पोलिस वसाहत

: उ प स्थि ती :

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. सुभाष झनक, वि.स.स.

३) श्री. अशोक जाधव, वि.स.स.

४) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

५) श्री. संदिप नाईक, वि.स.स.

६) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

७) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स.

८) श्री. विनोद घोसाळकर, वि.स.स.

९) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.

१०) श्री. मोहन जोशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)

मंत्रालयीन विभागीय प्रतीनिधी

१) श्री. उमेशचंद्र सरंगी, अपर मुख्य सचिव (गृह)
२) श्री. एस. के. मुखर्जी, सचिव, सा.बां.विभाग
३) श्री. प्रविण दीक्षित, महाव्यवस्थापक, पोलीस गृहनिर्माण विभाग
४) श्री. वि. धा. भाल, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण महामंडळ
५) श्री. सु. तु. वलेकर, मुख्य अभियंता (वि), सा.बां.विभाग
६) श्री. स. भ. तामसेकर, मुख्य अभियंता, सा.बां.मंडळ
७) श्री. महेन्द्र ब. वारभुवन, मुख्य अभियंता, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,म्हाडा
८) श्री. सदानंद दाते, विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन
९) श्री. उ. प्र. देबडवार, अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ
१०) श्री. एन.एस. राव, सहा.पोलीस आयुक्त

समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी मुंबईतील माहिम नवीन पोलीस वसाहत हमारतीच्या दुरावस्थेबाबत दिलेल्या भेटीच्या व त्यावेळी आढळून आलेल्या बाबींच्या अनुषंगाने गृह, सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या (चर्चा अपूर्ण)

तिसरी बैठक
दिनांक १२ जानेवारी, २०१२
स्थळ : मुंबई माहिम पोलिस वसाहत

: उ प स्थि ती :

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स., समिती प्रमुख

२) श्री. वल्लभ बेनके, वि.स.स.

३) श्री. सुभाष झनक, वि.स.स.

४) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.

५) श्री. अब्दुल रशीद ताहीर मोमीन, वि.स.स.

६) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

७) श्री. विनोद घोसाळकर, वि.स.स.

८) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
२) श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)

विभागीय प्रतिनिधी

१) श्री. उमेशचंद्र सरंगी, अपर मुख्य सचिव (गृह)
२) श्री. एस.के.मुखर्जी, सचिव,सा.बां.वि.(बांधकामे)
३) श्री. प्रवीण दीक्षित, व्यव.संचालक, पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ
४) श्री. तामसेकर, मुख्य अभियंता (सा.बां.वि.)
५) श्री. डेबडवार, अधीक्षक अभियंता (सा.बां.वि.)
६) श्री. महेंद्र वारभुवन, मुख्याधिकारी, मुंबई इमारत व घरदुरुस्ती मंडळ, म्हाडा
७) श्री. भाऊसाहेब जांगडे, मुख्याधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

१) श्री. धनंजय कुलकर्णी, उपायुक्त, परिमंडळ-५

समितीने माहिम पोलिस वसाहत येथे दिलेल्या भेटीच्या व त्यावेळी आढळून आलेल्या बाबींच्या संदर्भात दिनांक २३ नोव्हेंबर, २०१२ रोजी अपूर्ण राहिलेल्या गृह, सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या.

चौथी बैठक
दिनांक : १० डिसेंबर, २०१२
स्थळ -: विधान भवन, नागपूर
: उ प स्थि ती :

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.अशोक जाधव, वि.स.स.

३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

४) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

५) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.

६) श्री.विवेक पाटील, वि.स.स.

७) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.अशोक मोहिते, उप सचिव
२) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
३) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करून अहवाल संमत केला.